

"ज्ञान, विज्ञान आणि सुसंस्कार यांसाठी शिक्षणप्रसार"

-शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे

श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे,

(स्वायत्त) कोल्हापूर

# विवेकानंद कॉलेज, कोल्हापूर (स्वायत्त)

## इतिहास विभाग

************************************************************

**सूचना** दि. 28 / 12 / 2020

विवेकानंद कॉलेजच्या इतिहास विभागातील बी. ए. भाग - II च्या सर्व विद्यार्थी विद्यार्थिनींना सुचित करण्यात येते की, बुधवार दिनांक 30/12/2020 रोजी इतिहास पेपर क्रमांक – III "आधुनिक युरोपचा इतिहास" या विषयाच्या प्रकरण-4 (पहिले महायुद्ध) वरील ओपनबुक टेस्ट चे आयोजन चौथ्या तासाला रूम नंबर 11 मध्ये सकाळी 10 ते 10.45 या वेळेत केले आहे. तरी सर्व विद्यार्थ्यांनी तयारीनिशी टेस्टला वेळेवर उपस्थित राहावे.

**डॉ. एस. आर. कट्टीमनी**

इतिहास विभाग

VIVEKANAND COLLEGE KOLHAPUR (Autonomous) ESTD JUNE 1964



"ज्ञान, विज्ञान आणि सुसंस्कार यांसाठी शिक्षणप्रसार"

-शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे

श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे,

(स्वायत्त) कोल्हापूर

# विवेकानंद कॉलेज, कोल्हापूर (स्वायत्त)

## इतिहास विभाग

*********************************************************

**प्रश्नपत्रिका** दि. 30 / 01 / 2020

बी. ए. भाग - II

सेमिस्टर - III

पेपर क्रमांक - III

विषय - "आधुनिक युरोपचा इतिहास "

प्रकरण-4 . पहिले महायुद्ध

ओपनबुक टेस्ट

वेळ - सकाळी 10 ते 10.45

प्रश्न - पहिल्या महायुद्धाची कारणे स्पष्ट करा . (गुण-10)

COLLEGE KOLHAPUR ESTD JUNE 1964 (Autonomous)



"ज्ञान, विज्ञान आणि सुसंस्कार यांसाठी शिक्षणप्रसार"

-शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे

श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे,

(स्वायत्त) कोल्हापूर

# विवेकानंद कॉलेज, कोल्हापूर (स्वायत्त)

## इतिहास विभाग

**गुणपत्रक / मार्कलिस्ट** दि.30/1/2020

---

वर्ग - बी.ए.- II सेमिस्टर - III

पेपर क्र - III टेस्ट - ओपन बुक टेस्ट

प्रकरणाचे नाव - आधुनिक युरोपचा इतिहास एकूण गुण - 10

| अ.क्र. | रोल नंबर | मिळालेले मार्क्स | अ.क्र. | रोल नंबर | मिळालेले मार्क्स |
|---|---|---|---|---|---|
| 1 | S086 | 10 | 10 | S074 | 10 |
| 2 | S184 | 9 | 11 | S107 | 10 |
| 3 | S216 | 10 | 12 | | |
| 4 | S187 | 10 | 13 | | |
| 5 | S022 | 10 | 14 | | |
| 6 | S138 | 10 | 15 | | |
| 7 | S180 | 10 | 16 | | |
| 8 | S254 | 10 | 17 | | |
| 9 | S241 | 8 | 18 | | |

VIVEKANAND COLLEGE KOLHAPUR (Autonomous) ESTD JUNE 1964

विषय शिक्षक स्वाक्षरी

70

10/10

" ज्ञान, विज्ञान आणि सुसंस्कार यांसाठी शिक्षण प्रसार "
- शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे

Signature of Supervisor

Shri Swami Vivekanand Shikshan Sanstha's

**VIVEKANAND COLLEGE (Autonomous), KOLHAPUR**

विवेकानंद कॉलेज कोल्हापूर

20/9/2020

Class B.A.II Div. Roll No. 5086

Suppliment No. Shubhangi Uttam Jong Subject History

Test / Tutorial No. आधुनिक युरोप Paper No- V

प्र. पहिल्या महायुद्धाच्या कारणांचे चिकित्सक परीक्षण करा ?

→ **प्रस्तावना**

मानवाच्या आतापर्यंतच्या इतिहासात २०वे शतक हे संघर्षमय शतक ठरले गेले. कारण या शतकाची सुरुवातच भयंकर अशा पहिल्या युद्धाने झाली. इ.स 1914 ते 1918 या काळात पहिले महायुद्ध लढले गेले. हा प्रदीर्घ कालखंड, व्यापकता, शस्त्रास्त्रे, २८ देशांचा सहभाग, लष्कराबरोबर नागरीकांचा सहभाग, प्रचंड जीव व वित्तहानी इ. घटकामुळे याला महायुद्ध म्हणतात. या महायुद्धात इंग्लंड, फ्रान्स, रशिया, अमेरिका, जपान इ. देशाविरूद्ध जर्मनी, ऑस्ट्रिया, तुर्कस्तान बल्गेरिया असून जर्मनीच्या पराभव होवून हे दोन गटांमध्ये हे युद्ध झाले. त्यात शेवटी 1918 साली जर्मनीचा पराभव होवून हे युद्ध संपले. या महायुद्धाची कारणे पुढीलप्रमाणे सांगता येतील.

① युरोपमधील दोन प्रबळ गट :-

जर्मनी, ऑस्ट्रिया व इटली या देशांचा "त्रिराष्ट्र मैत्री करार" केला. त्याने युरोपातील सत्तेचा समतोल साधण्यात यश मिळाले. त्यांच्या आक्रमक धोरणामुळे विरोधी देश एकमेकांना सहकार्य करू लागले. त्यानुन 1893 साली रशिया - फ्रान्स मैत्री करार 1904 साली इंग्लड - फ्रान्स मैत्री करार, 1907 साली रशिया-

इंग्लंड मैत्री करार झाला, याप्रमाणे हे तीन देश एकत्र आले आणि त्यांचा त्रिराष्ट्र मित्र संघ उभारला गेला. अशा प्रकारे २० शतकाच्या अगदी प्रारंभी त्रिराष्ट्र मैत्री करार व त्रिराष्ट्र मित्र संघ असे दोन प्रबळ बनण्याचा प्रयत्न करीत राहिले. मतभेद, शत्रुत्व वाढत गेले ही परिस्थिती युद्धाला अनुकूल ठरली.

(ii) जर्मनीचे आक्रमक परराष्ट्रीय धोरण :-

जर्मनी या नवोदित युरोपीयन राष्ट्राचे परराष्ट्रीय धोरण बिस्मार्कने मुत्सद्दीपणे राबवून युरोपात जैसे थे परिस्थिती ठेवली. पण त्यांच्यानंतर कैसर या सत्ताधीशाला तसे धोरण राबविणे अशक्य ठरले. त्याने आक्रमक परराष्ट्रीय धोरण स्विकारून देशाला प्रतिष्ठा मिळवण्याचा प्रयत्न केला. दुसऱ्या देशाच्या अंतर्गत बाबीत हस्तक्षेप सुरू केला. बिस्मार्कने इंग्लंडचे नाविक सामर्थ्य व वर्चस्व मान्य केले होते.

(iii) युरोपातील लष्करवाद :-

महायुद्धापूर्वी युरोपातील परिस्थिती अशांत होती लष्करवादामुळे युरोपात शस्त्रास्त्रे वाढीची स्पर्धा लागली. जर्मनीने इंग्लंडला आव्हान देऊन नौदल वाढीच्या इ.स 1897 व 1907 साली दोन योजना आखल्या इंग्लंडने त्याला तसेच उत्तर दिले याबाबत मर्यादा घालवण्यासाठी रशियाच्या राजाने हेग येथे दोन आंतरराष्ट्रीय स्पर्धा घेतल्या पण त्यात अपयश आले, त्याला कैसर अधिक कारणीभूत होता. फ्रान्सबरोबर जर्मनीचे शत्रुत्व होतेच.
74 त्यामुळे फ्रान्सने आपले लष्करीबळ व शस्त्रास्त्रे मोठ्या प्रमाणावर वाढविण्यास सुरुवात केली. जनमत

अनुकूल बनविण्याचा जाणीवपूर्वक प्रयत्न केला.

(iv) नववसाम्राज्यवाद व वसाहती मिळवण्याची स्पर्धा :-

औद्योगिक क्रांतीबरोबर इतर कारणामुळे युरोपातील देशांना वसाहती मिळवण्याची गरज निर्माण झाली. त्यांचे इंग्लंडला फार मोठे फायदे मिळत होते त्यामुळे युरोपातील इतर देशांनीसुद्धा वसाहती मिळवण्याचे प्रयत्न सुरु केले इंग्लंडला हेवा करणारे देश अधिक प्रयत्न करु लागले एकप्रकारे तीव्र स्पर्धा सुरु झाली. वसाहतींच्या या स्पर्धेतून अनेक प्रश्न जटील बनत गेले अनेक देशातील शत्रुत्व वाढीस लागले. किंबहुना पहिल्या महायुद्धाच्या निमित्तमात्र कारणास ही स्पर्धाच कारणीभूत ठरली हे महत्वाचे आहे.

(v) आत्यंतिक राष्ट्रवाद :-

स्वतःच्या देशाबद्दल प्रेम भक्ती असणे या अर्थाने राष्ट्रवाद योग्य ठरतो पहिल्या महायुद्धापूर्वी युरोपीयन देशांनी आत्यंतिक राष्ट्रवाद स्वीकारल्याचे दिसते. स्वतःच्या देशाबद्दल प्रेम म्हणजे दुसऱ्या देशाच्या द्वेष असे राष्ट्रवादाला विकृत व अतिरेकी स्वरूप दिले होते जर्मनीबद्दल राष्ट्राभिमान म्हणजे फ्रान्स व इंग्लंडच्या द्वेश अशीच जर्मन जनतेची भावना होत गेली त्याचे त्याउलट फ्रान्स व इंग्लंडमध्ये परिणाम होवून जनतेच्या जर्मनीविरुद्ध भावना तयार झाल्या यातून शत्रुत्व वाढीला लागले.

ESTD JUNE 1964 (Autonomous)

(VI) वृत्तपत्रे तसेच युद्धानुकूल तत्वज्ञान :-

वृत्तपत्रे म्हणजे जनजागृतीचे फार महत्त्वाचे व प्रभावी साधन असते. परंतु महायुद्धापूर्वी युरोपातील वृत्तपत्रांनी भडकपणे, विपर्यास्त, अतिशोक्तीपूर्ण लिखाण केले त्यामुळे जनतेत युद्धाची भावना वाढीस लागली. पहिल्या महायुद्धापूर्वी युद्धाला अनुकूल असे तत्वज्ञान जनतेला पटवून देण्याचा पद्धतशीर प्रयत्न केला गेला. उदा; बिस्मार्कने जर्मनीच्या एकीकरणासाठी लोकशाहीचा नव्हे तर युद्धाचा मार्ग योग्य व आवश्यक असल्याचे सांगितले. कैसरने युद्ध व आक्रमक धोरण राबविले.

(VII) काही गंभीर प्रादेशिक प्रश्न :-

युरोपातील अस्थिर परिस्थितीत काही स्फोटक प्रादेशिक प्रश्नांनी अधिक भर घातली. उदा. इटलीची ट्रेंटिनो व ट्रिस्ट बंदर व भोवतालचा प्रदेश ऑस्ट्रियाच्या वर्चस्वाखाली होता तो मिळवण्यासाठी इटली प्रयत्नशील होता तर ऑस्ट्रियाचा विरोध होता त्यामुळे त्या दोन देशात शत्रूत्व होते दुसरा प्रश्न म्हणजे अल्सेस-लॉरेन्स फ्रान्सचा प्रदेश 1870-71 साली बिस्मार्कने जर्मनीला जोडला होता तेथील बहुतांश जनता फ्रेंच होती.

(VIII) आंतरराष्ट्रिय संघटनेचा अभाव :-

राष्ट्राराष्ट्रातील समस्या सोडवण्यासाठी आज संघटना व कायदे आहेत. त्याचे पालन केले जाते. पहिल्या महायुद्धापूर्वी जगात तशी व्यवस्था नव्हती. आंतरराष्ट्रीय करार मोडल्यास / बलिष्ठाने दुबळ्या

75

" ज्ञान, विज्ञान आणि सुसंस्कार यांसाठी शिक्षण प्रसार "
- शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे

Signature of Supervisor

Shri Swami Vivekanand Shikshan Sanstha's
VIVEKANAND COLLEGE (Autonomous), KOLHAPUR

Roll No. 5086

Class ____ Div. ____

Subject History

Suppliment No. ____

Test / Tutorial No. ____

देशावर अन्याय, आक्रमण केल्यास दाद मागण्याची व्यवस्था नव्हती. प्रत्येक राष्ट्र स्वतःच्या इच्छेप्रमाणे वागत असे 1899 व 1907 साली दोन शांतता परिषदा झाल्या होत्या त्यामध्ये आंतरराष्ट्रीय कायदेसंहिता यशस्वी ठरली असती. पण तसे न होता. 'बळी तो कान पिळी' या न्यायाने देश वागले.

(IX) बाल्कन प्रश्न :-

बाल्कन प्रदेशातील मॅसिडोनीयाच्या वर्चस्वावरून सर्बियाला रशियाने पाठिंबा दिला. तर ऑस्ट्रिया व जर्मनीने विरोध केला 1878 साली बर्लिन परिषदेने बाल्कनमधील बोस्निया व हर्जेगोविना या स्लाव प्रदेशाचा राज्यकारभार ऑस्ट्रियाकडे सोपविला. बाल्कन प्रश्नाचे गांभीर्य सांगताना इतिहासकार ग्रँट टेंम्पर्ले म्हणतात - "1914 च्या महायुद्धाला बाल्कन युद्धे जितकी कारणीभूत झाली तितकी इतर कोणतीही गोष्ट कारणीभूत झाली नाही.

(X) तात्कालीन कारण · आर्च ड्युक फर्डिनंडचा खून :-

28 जून 1914 रोजी ऑस्ट्रियाचा राजपुत्र

ESTD JUNE VIVEKANAND COLLEGE KOLHAPUR (Autonomous)

आर्चे ड्युक फर्डिनांड आपल्या पत्नीसह बोस्नियाची राजधानी सेरेजोव्ह येथे गेला होता तेथे एका दहशत-वादी संघटनेने त्याचा खून केला जर्मनीने ऑस्ट्रियाला तर रशियाने सर्बियाला पाठिंबा दिला. दरम्यान युद्ध टाळण्याचे काही प्रयत्न झाले पण ऑस्ट्रियाने ताठर भूमिका घेतली आणि 28 जुलै 1914 रोजी सर्बियाविरुद्ध युद्ध पुकारले यातून पहिले महायुद्ध सुरु झाले.

मूल्यमापन

पहिले महायुद्ध 1914 ते 1918 असे दिर्घकाळ चालले. शेवटी नोव्हेंबर 1918 मध्ये जर्मनीने शरणागती पत्करली. कैसर हॉलंडला पळून गेला. जर्मनीत सत्तेवर आलेल्या प्रजासत्ताक सरकारने तह मान्य केला अशा रीतीने भूमी, आकाश, समुद्र अशा तिन्ही ठिकाणी लढलेले महायुद्ध 1918 साली संपले.

" ज्ञान, विज्ञान आणि सुसंस्कार यांसाठी शिक्षण प्रसार "
– शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे

9/10

Signature of Supervisor: [signature]

Shri Swami Vivekanand Shikshan Sanstha's

# VIVEKANAND COLLEGE (Autonomous), KOLHAPUR

20/9/2020

Class BA-II Sem-IV Div. — Roll No. 5184

Suppliment No. Home assignment Subject History

Test / Tutorial No. Manasi Tatyasaheb Navale.
Name :-

प्र. पहिल्या महायुद्धाच्या कारणांचे चिकित्सक परिक्षण करा.

बिस्मार्कच्या प्रयाणानंतर युरोपमध्ये परस्पर अविश्वासाचे व स्पर्धेचे वातावरण निर्माण झाले. परिणामी त्यातूनच प्रत्येक राज्यात शस्त्र स्पर्धा निर्माण झाली. या शस्त्रस्पर्धेचा परिणाम महायुद्धात घडून आला. अशा प्रकारे जर्मनी व इटली ह्या राष्ट्रांचा उदय झाला. त्यानंतर युरोपच्या राजकारणात जे स्पर्धेचे वातावरण निर्माण झाले त्यातूनच हे महायुद्ध घडून आले.

पहिले महायुद्ध अतिशय विनाशकारी ठरले. जे जवळजवळ 1535 दिवस 4 वर्षे लढले गेले. त्यात जवळजवळ 65 कोटी लोकांनी भाग घेतला व 13 कोटी लोक त्यात ठार झाले. 22 कोटी लोक जखमी झाले व 7 कोटी लोक कायमचे अपंग झाले. पहिले महायुद्ध इतक्या विशाल प्रमाणावर झाल्याने ते कोणत्याच परिस्थितीत निर्माण झाले किंवा ते होण्यास कोणती कारणे घडून आलीत ती कारणे पाहणे आवश्यक ठरते.

पहिल्या महायुद्धाची कारणे.

VIVEKANAND COLLEGE ESTD JUNE 1964 (Autonomous)

77

१) दोन परस्पर विरोधी गट :-

युरोपात गटबाजीचे राजकारण बिस्मार्क-च्या काळापासून म्हणजे इ.स. 1870 पासून उदयाला आलेले आपल्याला दिसते. जर्मनीचे एकीकरण टिकवून धरण्याकरिता बिस्मार्क कोणतेही नैतिक संकेत न मानता युरोपातील कोणत्याही राष्ट्राशी मैत्री करायला तयार होता. बिस्मार्कच्या 'फोडा आणि झोडा' ह्या धोरणामुळे युरोपातील देश दोन गटात विभागल्या गेल्याने हे दोन्ही गट एकमेकांशी संघर्ष करण्यास उत्सुक बनले. बिस्मार्कच्या आपल्या कारकिर्दीत रशिया आणि फ्रान्स यांना एकमेकांत मैत्री करण्यापासून परावृत्त केले होते. परंतु बिस्मार्कच्या मृत्युनंतर राजकीय वातावरणात अमुलाग्र बदल घडून आले. युरोप दोन सशस्त्र गटात विभागला गेला व त्या दोहोत परस्पर द्वेष, असुया, स्पर्धा आणि प्रखर हेवेदावे असल्याने त्याची परिणती पहिल्या महायुद्धात घडून आली.

२) असुरक्षिततेच्या भावनेतून निर्माण झालेली लष्करी स्पर्धा

दोन परस्परविरोधी गट युरोपात अस्तित्वात असताना त्यांना एकमेकांची भिती वाटणे सहाजिकच होते. युद्धाचा उद्भव केव्हाही होणे शक्य असल्याने प्रत्येक राष्ट्राने शस्त्रसज्ज होण्याची स्पर्धा चालविली त्यामुळे प्रत्येक राष्ट्रांचा लष्करावरचा खर्च मोठ्या प्रमाणावर वाढला त्यामुळे युरोपात अनिर्बंध लष्करीकरणाची लाट निर्माण होऊन त्याची परिणिती महायुद्धात घडून आली.

(78)

३) राष्ट्रवादाची प्रखर भावना :-

अमेरिकन स्वातंत्र्ययुद्ध, फ्रेंच राज्यक्रांती इ. विविध घटनांनी राष्ट्रवादाला जन्म दिला होता. एक

JUNE 1954 (Autonomous)

भाषा, एक संस्कृती असणाऱ्या लोकांचे एक राष्ट्र असले पाहिजे ही भावना नैसर्गिक होती व म्हणूनच त्यातून जर्मनी, ईटली यांसारख्या राष्ट्रराज्यांचा उदय झाला. परंतु पलीकडे राष्ट्रनिष्ठा, राष्ट्रप्रेम यांचा मोठा विकृत अर्थ प्राप्त झाला. राजकारणी नेत्यांनी राष्ट्रभावनेचा पुरेपुर उपयोग करून घेतला. परस्परांमध्ये द्वेष भावनेला मोठे खतपाणी घातले. शासकांनी अतिरेकी राष्ट्रभावनेला आवर न घातल्याने त्यातून महायुद्ध उद्भवले.

4) आर्थिक वर्चस्वाची अभिलाषा :-

19 व्या शतकात जुना वसाहतवाद लयाला जावून त्याची जागा आता नवीन साम्राज्यवादाने घेतली. औद्योगिक क्रांतीनंतर उत्पादनाच्या तंत्रात अमुलाग्र क्रांती घडून येताच यंत्राच्या सहाय्याने मोठ्या प्रमाणात उत्पादन होऊ लागले. त्यामुळे युरोपातल्या प्रत्येक राष्ट्राला आपल्या देशात निर्माण झालेल्या जास्तीच्या मालाकरीता नवीन बाजारपेठांची आवश्यकता वाटू लागली. अशा रितीने मोठाच आर्थिक साम्राज्यवाद निर्माण होऊन त्याचे रुपांतर एकमेकांच्या द्वेषभावनेत झाले. आर्थिक वर्चस्व निर्माण करण्याच्या प्रयत्नातून महायुद्ध निर्माण झाले.

5) वृत्तपत्रीय एकांगी विषारी प्रचार :-

ह्या काळात एकमेकांविषयीची मने अगोदरच कलुषित झालेली होती. त्यात वैरभावना पेटवण्याचे कार्य दुर्दैवाने वृत्तपत्रातील एकांगी प्रचाराने केले. प्रत्येक राष्ट्रातील वृत्तपत्रांनी राष्ट्रभावनेवर जोर देऊन राष्ट्रीय भावना चेतवण्याचा सतत प्रयत्न केला.

ESTD JUNE 1964 (Autonomous)

70

6) युरोपीय पूर्वग्रह दुषित मन :-
वृत्तपत्रांनी सतत केलेल्या भडक प्रचारामुळे राजकारणी लोकांनी केलेल्या विकृत प्रचारामुळे युरोपीय जनमत प्रक्षुब्ध बनले व त्यांचे संतुलन बिघडले. त्यातच राजकारणात प्रामाणिकपणा व सचोटी यांना अर्थ न उरल्याने युरोपीय मन प्रत्येक प्रश्नाकडे पुर्वग्रहदुषित दृष्टीनेच पाहु लागले. एका दृष्टीने युरोपीय मनात विकृती निर्माण झाली व त्यानेच महायुद्धात घडून आले.

7) राजकारणातील गुप्ततेची वाटचाल :-
ह्या कालखंडातील आंतरराष्ट्रीय राजकारणाचे आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे त्यातील कमालीची गुप्तता. पुष्कळवेळा राजप्रमुख स्वतःच्या मंत्रिमंडळाला अंधारात ठेऊन इतर देशांशी गुप्त करार करीत असे ह्या राजकारणातील गुप्ततेमुळे परस्पर अविश्वास आणि संशय निर्माण झाला. त्यामुळे अस्थिरता निर्माण होऊन महायुद्धात उद्भव झाला.

8) तत्वज्ञानांची शिकवण :-
ह्या काळात हेगेल आदि जे तत्वज्ञ होऊन गेलेत. त्यांच्याही तत्वज्ञानाचा मोठा सखोल परिणाम जर्मन तरूणांवर घडून आला. हेगेलने राष्ट्र म्हणजे परमेश्वर अशी शिकवण देऊन राष्ट्राकरीता व्यक्तीने आत्मसमर्पण करण्याकरिता सतत तयार असावे असा पुरस्कार केला. ह्या सर्व तत्वज्ञानाचा पारंपारिक म्हणजे जर्मन तरूण युद्धावर मनापासून श्रद्धा ठेवु लागला व त्यातूनच पहिले महायुद्ध उद्भवले.

"ज्ञान, विज्ञान आणि सुसंस्कार यांसाठी शिक्षण प्रसार"
- शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे

Signature of Supervisor

Shri Swami Vivekanand Shikshan Sanstha's
VIVEKANAND COLLEGE (Autonomous), KOLHAPUR

Roll No.

Class Div

Subject

Suppliment No.

Test / Tutorial No.

१) तत्कालिन कारण :-

आर्च ड्युक फर्डिनंडचा खुन :-

अशा रितीने उभय पक्षात वैराग्नी पेटला असताना आणि संपूर्ण युरोपात विलक्षण तणावाचे व प्रक्षोभाचे वातावरण निर्माण झाले असताना ह्या वातावरणात एक भयंकर घटनेची ठिणगी पडली. ती भयंकर घटना म्हणजे ऑस्ट्रियाचा राजपुत्र आर्च ड्युक फ्रान्सिस फर्डिनंड व त्याची पत्नी यांचा खून. हे दोघेही बोस्निया प्रांताची राजधानी सरजेव्हो ह्या ठिकाणी गेले असताना त्यांचा भररस्त्यात खून करण्यात आला. ह्या खूनामुळे संपूर्ण युरोपात एकच निषेधाची व प्रक्षोभाची लाट निर्माण झाली. ऑस्ट्रियन सरकारने खूनाची जबाबदारी सर्बिया या देशाला ठेवले व सर्बियाने खूनाची जबाबदारी नाकारली. त्यामुळे ऑस्ट्रियाने सर्बियाविरूद्ध युद्ध पुकारले व अशा रितीने पहिल्या महायुद्धास सुरूवात झाली.

ESTD JUNE 1964 Autonomous

81

" ज्ञान, विज्ञान आणि सुसंस्कार यांसाठी शिक्षण प्रसार "
- शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे

Signature of Supervisor

Shri Swami Vivekanand Shikshan Sanstha's
**VIVEKANAND COLLEGE (Autonomous), KOLHAPUR**

20/9/2020

Class बी.ए. भाग दोन Div. Roll No. 5216

Suppliment No. Subject इतिहास पेपर V

Test / Tutorial No. नाव - संग्राम प्रकाश पाटील.

प्र. पहिल्या महायुद्धाच्या कारणांचे मूल्यमापन करा.

प्रस्तावना

मानवाच्या आतापर्यंतच्या इतिहासात २० वे शतक हे संघर्षमय शतक ठरले आहे. कारण या शतकाची सुरवातच भयंकर अशा स्वरूपाच्या पहिल्या महायुद्धाने झाली.

1914-1918 या काळात पहिले महायुद्ध लढले गेले. हा प्रदीर्घ कालावधी, प्रचंड व्यापकता, शस्त्रास्ते, २८ देशांचा सहभाग लष्कराबरोबर नागरिकांचा समावेश, प्रचंड जिवित व वित्त हानी इ. घटकांमुळे याला महायुद्ध म्हणतात. या महायुद्धात इंग्लंड, फ्रान्स, रशिया, अमेरिका, जपान इ. देशांविरुद्ध जर्मनी, आस्ट्रिया, तुर्कस्थान, बल्गेरिया या दोन राष्ट्रगटांमध्ये हे युद्ध झाले. त्यात 1918 साली जर्मनीचा पराभव होऊन या युद्धाचा शेवट झाला.

अशाप्रकारे सर्वकश व सर्वव्यापी स्वरूप असणारे पहिले महायुद्ध अचानक किंवा एकाएकी घडून आले नसून ते 19 व्या शतकात घडलेल्या राजकीय, आर्थिक घडामोडी, आणि वैचारिक क्रांती यांचा परिपाक होता. या महान आपत्तीस खालील घटकांनी हातभार लावला.

अतिरेकी राष्ट्रवाद

आपल्या राष्ट्रावर प्रेम करणे म्हणजे राष्ट्रवाद होय. राष्ट्राच्या प्रगतीसाठी राष्ट्रवाद आवश्यक असतोच, तथापी आपल्या राष्ट्राच्या प्रगतीसाठी दुसऱ्या देशाला कमी लेखणे, त्यांचे स्वातंत्र्य हिरावून घेणे आणि त्या देशाची पिळवणूक करणे याला अतिरेकी राष्ट्रवाद म्हणतात. या अतिरेकी राष्ट्रवादाने पहिल्या महायुद्धाला हातभार लावला. जगावर राज्य करण्याचा आपल्याच राष्ट्राला

College ESTD JUNE 1964 (Autonomous)

अधिकार आहे असे अनेक राष्ट्रांना वाटू लागले. अनेक राष्ट्रांत अतिरेकी राष्ट्रवादाचा उदय होऊन राष्ट्रा-राष्ट्रांत शत्रुत्वाचे संबंध निर्माण झाले. यातूनच जर्मनी-फ्रान्स संघर्ष, इटली ऑस्ट्रिया संघर्ष, जर्मनी-इंग्लंड संघर्ष, तुर्कस्थानमधील बाल्कन प्रश्न ऑस्ट्रिया-सार्बिया संघर्ष, अशा स्वरूपाचे संघर्ष वाढीस लागले, यामुळे युरोपातील शांतता धोक्यात येऊन युरोप महायुद्धाच्या दिशेने वाटचाल करू लागला.

2) युरोपची दोन गटांत विभागणी -

बिस्मार्कने मुत्सद्देगिरीने व कुटनितीच्या जोरावर जर्मनीचे एकीकरण यशस्वी केले. अनेक आंतरराष्ट्रीय करार करून जर्मनीला सहानुभूती तर फ्रान्सला एकाकी पाडण्याचा सतत प्रयत्न केला. यातून या देशांचा 'त्रिराष्ट्र मैत्री करार केला. परंतु यानंतर कैसर विल्यमच्या आक्रमक धोरणामुळे विरोधी देश एकमेकांना सहकार्य करू लागले. त्यातून रशिया, फ्रान्स, इंग्लंड मैत्री करार झाले. यांचा 'त्रिराष्ट्र मैत्री संघ' उभारला गेला. अशा प्रकारे 20 व्या शतकात त्रिराष्ट्र मैत्री करार व त्रिराष्ट्र मैत्री संघ असे दोन प्रबळ गट युरोपात तयार झाले.

3) जर्मनीचे आक्रमक परराष्ट्रीय धोरण -

जर्मनी या नवोदित युरोपियन राष्ट्राचे परराष्ट्रीय धोरण बिस्मार्कने राबवून युरोपात जैसे थे परिस्थिती ठेवली. पण त्याच्यानंतर कैसर या सत्ताधीशाला तसे धोरण राबविणे अशक्य झाले. त्याने आक्रमक परराष्ट्रीय धोरण स्विकारले. दुसऱ्या देशाच्या अंतर्गत बाबीत हस्तक्षेप सुरू केला. कैसरने इंग्लंडला आव्हानात्मक अशा नाविक योजना आखल्या, नौदल वाढविले, त्यामुळे इंग्लंड-जर्मनी संघर्ष अटळ बनला. इंग्लंडने अलिप्ततेचे धोरण सोडून 'हुकूमी हस्तक्षेपाचे' धोरण स्वीकारले, कैसरने वसाहतवाद, साम्राज्यवाद, लष्करीकरण असे धोरण राबवण्यास सुरुवात केली. या आक्रमक धोरणामुळे युद्धानुकूल वातावरण तयार होत गेले.

④ युरोपातील लष्करवाद -

महायुद्धापुर्वी युरोपातील स्थिती अशांत होती. प्रत्येक देश स्वतःच्या संरक्षणासाठी प्रयत्न करू लागला. हे वातावरण लष्करीकरणास अनुकूल ठरले. यावर बंधने नव्हती. यासाठी प्रचंड खर्च होऊ लागला. लष्करवादामुळे युरोपात शस्त्रास्त्रवाढीची स्पर्धा लागली. जर्मनीने इंग्लंडला आव्हान देऊन नौदल वाढीच्या इ.स. 1897 व 1907 साली दोन योजना आखल्या. इंग्लंडने त्याला तसेच उत्तर दिले. याबाबत मर्यादा घालण्यासाठी हेग येथे 2 आंतरराष्ट्रीय परिषदा घेतल्या, पण त्यात अपयश आले. त्याला कैसर कारणीभूत होता. फ्रान्सबरोबर जर्मनीचे शत्रुत्व होतेच, फ्रान्सने आपले लष्करीबळ वाढवण्यास सुरवात केली.

⑤ नवसाम्राज्यवाद व वसाहती मिळवण्याची स्पर्धा -

औद्योगिक क्रांतीबरोबर इतर कारणांमुळे युरोपातील देशांना वसाहती मिळवण्याची गरज निर्माण झाली. त्याचबरोबर वसाहती असणे हे त्यांनी प्रतिष्ठेचे मानले होते. युरोपातील इतर देशांनीसुद्धा वसाहती मिळवण्याचे प्रयत्न सुरू केले. एकप्रकारे तीव्र स्पर्धा सुरू झाली. वसाहतींच्या या स्पर्धेतून अनेक प्रश्न जटील बनत गेले. अनेक देशांतील शत्रुत्व वाढीस लागले. बाल्कन प्रदेशातील वर्चस्वावरून रशिया - ऑस्ट्रिया, मोरोक्कोवरून जर्मनी - फ्रान्स अशी अनेक उदाहरणे सांगता येतील. या स्पर्धेमुळे महायुद्धास हातभार लागला.

⑥ वृत्तपत्रे तसेच युद्धानुकूल तत्वज्ञान -

वृत्तपत्र म्हणजे 'मानवी मनाचे प्रतिबिंब होय'. परंतु महायुद्धापुर्वी युरोपातील वृत्तपत्रांनी भडकपणे, विपर्यास्त, अतिशयोक्तीपुर्ण लिखाण केले. आंतरराष्ट्रीय स्वरूपाच्या सभा, बैठका, चर्चा इ. बाबत विपर्यस्त लिखाण केले गेले. जनतेपुढे सत्य, निर्दोष लिखाण येण्याऐवजी शत्रुराष्ट्राविषयी द्वेष, संताप निर्माण होईल असे लिखाण केले.

COLLEGE ESTD JUNE 1964 (Autonomous)

बिस्मार्कने जर्मनीच्या एकीकरणासाठी लोकशाहीचा नव्हे तर युद्धाचा मार्ग योग्य व आवश्यक सांगितला. कैसरने युद्ध व आक्रमक धोरण राबविले. रस्किन म्हणतो युद्धातून राष्ट्राचा जन्म तर युद्धातून शेवट होतो. तेव्हा इंग्लंडने युद्धाला तयार व्हावे. अशा प्रकारचे तत्वज्ञान पसरवले गेले.

७) काही गंभीर प्रादेशिक प्रश्न -

युरोपातील अस्थिर परिस्थितीत काही स्फोटक प्रादेशिक प्रश्नांनी अधिक भर घातली. इटलीची ट्रेंटिनो व ट्रिस्ट बंदर व भोवतालचा प्रदेश ऑस्ट्रियाच्या वर्चस्वाखाली होता. तो मिळवण्यासाठी इटली प्रयत्नशील होता. दुसरा प्रश्न म्हणजे अल्सेस लॉरेन्स फ्रान्सचा प्रदेश १८७०-७१ साली बिस्मार्कने जर्मनीस जोडला होता. तेथील बहुतांश जनता फ्रेंच होती. प्रदेश समृद्ध होता. बिस्मार्कने फ्रान्सवर केलेला हा अन्याय होता. यावरून फ्रान्स जर्मनीतील शत्रुत्व वाढत गेले.

८) आंतरराष्ट्रीय संघटनेचा अभाव -

राष्ट्राराष्ट्रांतील समस्या सोडवण्यासाठी आज संघटना व कायदे आहेत. त्याचे पालन केले जाते. पहिल्या महायुद्धापूर्वी जगात तशी व्यवस्था नव्हती. आंतरराष्ट्रीय करार मोडल्यास किंवा बलिष्ठाने दुबळ्या देशावर अन्याय, आक्रमण केल्यास दाद मागण्याची व्यवस्था नव्हती. प्रत्येक राष्ट्र स्वतःच्या इच्छेप्रमाणे वागत असे. १८९९ व १९०७ साली दोन शांतता परिषदा झाल्या होत्या. यामध्ये आंतरराष्ट्रीय कायदेसंहिता यशस्वी ठरली असती. पण तसे न होता. 'बळी तो कान पिळी' या न्यायाने देश वागले.

९) बाल्कन प्रश्न -

बाल्कन प्रदेशात अनेक देशांचे हितसंबंध होते. त्यामुळे तो प्रश्न गुंतागुंतीचा बनला होता. विशेषतः रशिया व ऑस्ट्रियामध्ये मोठी स्पर्धा होती. बाल्कन प्रदेशातील मॅसिडोनियाच्या वर्चस्वावरून सार्बियाला रशियाने पाठिंबा दिला.

" ज्ञान, विज्ञान आणि सुसंस्कार यांसाठी शिक्षण प्रसार "
- शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे

Signature of Supervisor

Shri Swami Vivekanand Shikshan Sanstha's
VIVEKANAND COLLEGE (Autonomous), KOLHAPUR

Class ______ Div ______ Roll No. ______

Suppliment No. ______ Subject ______

Test / Tutorial No. ______

तर ऑस्ट्रिया व जर्मनीने विरोध केला. बाल्कन मधील स्लाव वंशीय लोकांचे एकत्रीकरण करण्याचा सार्बिया प्रयत्न करत होता तर ऑस्ट्रिया विरोधी होता. 1878 साली बर्लिन परिषदेने बाल्कन मधील बोस्निया व हर्जेगोविना या स्लाव प्रदेशाचा राज्य-कारभार ऑस्ट्रियाकडे सोपविला. 1908 साली ऑस्ट्रियाने हे दोन्ही प्रांत आपल्या साम्राज्यात विलीन केले. सार्बियाने याला विरोध केला. रशियाने सार्बियाला बिनाशर्त पाठिंबा दिला. यामुळे बाल्कन प्रश्न गंभीर बनला. 1912-13 मध्ये बाल्कन युद्धे झाली. सार्बियाला शह देऊन बाल्कनमध्ये वर्चस्व वाढविण्याचा जर्मनी-ऑस्ट्रियाचा प्रयत्न चालूच राहिला.

10) तात्कालीक कारण - आर्च ड्यूक फर्डिनांडचा मृत्यू -

बाल्कन प्रश्नावरून ऑस्ट्रिया - सार्बिया यांच्यातील शत्रुत्व वाढत गेले. 28 जून 1914 रोजी ऑस्ट्रियाचा राजपुत्र आर्च ड्यूक फर्डिनांड आपल्या पत्नीसह बोस्नियाची राजधानी सेरेजोव्ह येथे गेला होता. तेथे एका दहशतवादी संघटनेने त्याचा खून केला. सार्बियाने त्यासाठी शस्त्रास्त्रे पुरविली, चिथावणी दिली असा ऑस्ट्रियाने आरोप केला. आणि 48 तासांची मुदत सार्बियाला दिली. जर्मनीने ऑस्ट्रियाला तर रशियाने सार्बियाला पाठिंबा दिला. दरम्यान युद्ध टाळण्याचे काही प्रयत्न झाले. पण ऑस्ट्रियाने ताठर भूमिका घेतली आणि 28 जुलै 1914 रोजी सार्बियाविरुद्ध युद्ध पुकारले. यातून पहिले महायुद्ध सुरु झाले.

मुल्यमापन -

1914 साल जर्मनीला अनेक आघाड्यांवर लाभदायक ठरले. रशियाची परिस्थिती बिकट होऊन जाऊन जर्मनीकडून

रशियाचा पराभव होवू लागला. १९१५ साली सागरी लढाई सुरू झाली. शेवटी नोव्हेंबर १९१८ मध्ये जर्मनीने शरणागती पत्करली, अशा रितीने भुमी, आकाश, समुद्र अशा तिन्ही ठिकाणी लढलेले महायुध्द १९१८ साली संपले.

VIVEKANAND COLLEGE KOLHAPUR
ESTD JUNE 1964

" ज्ञान, विज्ञान आणि सुसंस्कार यांसाठी शिक्षण प्रसार "
– शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे

10/10

Signature of Supervisor: [signature]

Shri Swami Vivekanand Shikshan Sanstha's
# VIVEKANAND COLLEGE (Autonomous), KOLHAPUR

20/9/2020

Class: B.A-II (Sem-IV) Div. ____ Roll No. C 5187

Suppliment No.: Home Assigment Subject: History (Madam)

Test / Tutorial No.: Omkar Sachin Patkhande

प्र. 1 पहिल्या महायुद्धाच्या कारणांचे चिकित्सक परीक्षण करा.

→ बिस्मार्कच्या प्रयाणानंतर युरोपामध्ये परस्पर अविश्वासाचे व स्पर्धेचे वातावरण निर्माण झाले व परिणामी त्यातूनच प्रत्येक राज्यात शस्त्र स्पर्धा निर्माण झाली त्या शस्त्रस्पर्धेच्या परिणाम महायुद्धात घडून आला. अशा रीतीने जर्मनी व इटली या राष्ट्रांच्या उदय झाल्यानंतर युरोपच्या राजकारणात जे स्पर्धेचे वातावरण निर्माण झाले त्यातूनच हे महायुद्ध घडून आले.

पहिले महायुद्ध अतिशय विनाशकारी ठरले ते जवळजवळ 1535 दिवस म्हणजे 4 वर्षे काळले गेले. त्यात जवळजवळ 65 कोटी लोकांनी भाग घेतला व 13 कोटी लोक त्यात ठार झाले. 22 कोटी लोक जख्मी झाले व 7 कोटी लोक कायमचे पंगु झाले. पहिले महायुद्ध इतक्या विशाल प्रमाणावर झाल्याने ते कोणत्या परिस्थितीत निर्माण झाले किंवा ते होण्यास कोणती कारणे घडून आलीत ती कारणे पाहणे आवश्यक ठरते.

## पहिल्या महायुद्धाची कारणे !-

1) दोन परस्पर विरोधी गट -

युरोपात गटबाजीचे राजकारण बिस्मार्कच्या काळापासून म्हणजे इ.स. 1870 पासून उदयाला आलेले आपल्याला दिसते. जर्मनीचे एकीकरण टिकवून धरण्याकरिता बिस्मार्कने कोणतेही नैतिक संकेत

Vivekanand College (Autonomous) Kolhapur, Estd. June 1964

(44)

न मानता युरोपातील कोणत्याही राष्ट्राशी मैत्री करायला तयार होता. बिस्मार्कच्या 'फोडा आणि झोडा' ह्या धोरणामुळे युरोपातील देश दोन गटात विभागल्या जाऊन हे दोन्ही गट एकमेकांशी संघर्ष करण्यास उत्सुक बनले. बिस्मार्कच्या आपल्या कारकिर्दीत रशिया आणि फ्रान्स यांना एकमेकांत मैत्री करण्यापासुन परावृत्त केले होते. परंतु ~~बि~~ बिस्मार्कच्या मृत्युनंतर राजकीय वातावरणात आमुलाग्र बदल घडून आले. युरोप दोन सशस्त्र गटात विभागल्या गेला व त्या दोहोत परस्पर द्वेष, असुया, स्पर्धा आणि प्रखर हेवेदावे असल्याने त्याची परिणती पहिल्या महायुध्दात घडून आली.

२) असुरक्षिततेच्या भावनेतुन निर्माण झालेली लष्करी स्पर्धा.

दोन परस्परविरोधी गट युरोपात अस्तित्वात असताना त्यांना एकमेकांची भीती वाटणे साहजिकच होते. युध्दाच्या उद्भव केव्हाही होणे शक्य असल्याने प्रत्येक राष्ट्राने शस्त्रसज्ज होण्याची स्पर्धा चालविली. त्यामूळे प्रत्येक राष्ट्रांचा लष्करावरचा खर्च मोठ्या प्रमाणात वाढला. त्यामूळे युरोपात अनिर्बंध लष्करीकरणाची लाट निर्माण होवुन त्याची परिणती महायुध्दात घडुन आली.

३) राष्ट्रवादाची प्रखर भावना व त्यातून निर्माण झालेल्या विकृती -

अमेरिकन स्वातंत्र्य युध्द, फ्रेंच राज्यक्रांती इ. विविध घटनांनी राष्ट्रवादाला जन्म दिलेला होता. एक भाषा, एक संस्कृती असणाऱ्या लोकांचे राष्ट्र असले पाहिजे ही भावना नैसर्गिक होती व म्हणूनच त्यातूनच जर्मनी, इटलीसारख्या राष्ट्र राज्याचा उदय झाला. परंतु पलीकडे राष्ट्रनिष्ठा,

राष्ट्रप्रेम यांचा मोठा विकृत अर्थ प्राप्त झाला. राज-
कारणी नेत्यांनी राष्ट्रभावनेचा फुरेपूर उपयोग करून
घेऊन परस्परांच्या द्वेष भावनेला मोठे खतपाणी
घातले. शासकांनी अतिरेकी राष्ट्रभावनेला आवर न
घातल्याने त्यातून महायुद्ध उद्भवले.

4) आर्थिक वर्चस्वाची अभिलाषा -

१९ व्या शतकाला जुना वसाहतवाद
लयाला जावून त्याची जागा आता नवीन साम्राज्यवादाने
घेतली. औद्योगिक क्रांतीनंतर उत्पादनाच्या तंत्रात आमु-
लाग्र क्रांती घडून येताच यंत्रांच्या सहाय्याने मोठ्या
प्रमाणात उत्पादन होवू लागले. त्यामुळे युरोपातल्या प्रत्येक
राष्ट्राला आपल्या देशात निर्माण झालेल्या जास्तीच्या
मालाकरिता नवीन बाजारपेठांची आवश्यकता वाटू
लागली. अशा रितीने मोठाच आर्थिक साम्राज्यवाद
निर्माण होवून त्याचे रुपांतर एकमेकांच्या द्वेषभावनेत
झाले. आर्थिक वर्चस्व निर्माण करण्याच्या प्रयत्नातून
महायुद्ध निर्माण झाले.

5) वृत्तपत्रीय एकांगी विषारी प्रचार -

ह्या काळात एकमेकांविषयीची मने
अगोदरच कलुषित झालेली होती. त्यात वैरभावना पेट-
विण्याचे कार्य दुर्दैवाने वृत्तपत्रातील एकांगी प्रचाराने
केले. प्रत्येक राष्ट्रातील वृत्तपत्रांनी राष्ट्रभावनेवर जोर
देऊन राष्ट्रीय भावना चेतविण्याचा सतत प्रयत्न केला

6) युरोपीय पूर्वग्रह दूषित मन -

वृत्तपत्रांनी सतत केलेल्या भडक
प्रचारामुळे राजकारणी लोकांनी केलेल्या विकृत
प्रचारामुळे युरोपीय जनमत प्रक्षुब्ध बनले व
त्याचे संतुलन बिघडले. त्यातच राजकारणात प्रामा-

निकपणा व त्यामुळे संतुलन बिघडले अचोरी यांना अर्थ न उरल्याने व युरोपीय मन प्रत्येक प्रश्नाकडे पूर्वग्रहदुषित दृष्टीनेच पाहू लागले. एका दृष्टीने युरोपीय मनात विकृती निर्माण झाली व त्याचेच पर्यवसन महायुद्धात घडुन आले.

७) राजकारणातील गुप्ततेची वाटचाल -

ह्या कालखंडातील आंतरराष्ट्रीय राजकारणाचे आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे त्यातील कमालीची गुप्तता. पुष्कळवेळा राजप्रमुख स्वतः च्या मंत्रिमंडळाला अंधारात ठेवून इतर देशांशी गुप्त करार करीत असे. ह्या राजकारणातील गुप्ततेमुळे व परस्पर अविश्वास आणि संशय निर्माण झाला. त्यामुळे अस्थिरता निर्माण होऊन महायुद्धात उद्भव झाला.

८) तत्वज्ञानांची शिकवण :-

ह्या काळात हेगेल आदि जे तत्वज्ञ होवुन गेलेत त्यांच्याहि तत्वज्ञानाचा मोठा सखोल परिणाम जर्मन तरुणांवर घडुन आला. हेगेलने राष्ट्र म्हणजे परमेश्वर अशी शिकवण देऊन राष्ट्रकरिता व्यक्तीने आत्मसमर्पण करण्याकरिता सतत तयार असावे असा पुरस्कार केला. ह्या सर्व तत्वज्ञानाचा परिपाक म्हणजे जर्मन लोकांना युद्धावर मनापासून श्रद्धा ठेवू लागला व त्यातुनच पहिले महायुद्ध उद्भवले.

९) तत्कालिन कारण -

आर्च ड्युक फर्डिनंडचा खुन अशा रीतीने युरोप प्रकात वैराग्नी पेटला असताना आणि संपूर्ण युरोपभर विलक्षण तणावाचे व प्रक्षोभाचे वातावरण

निर्माण झाले असताना ह्या वातावरणात एक भयंकर घटनेची ठिणगी पडली ती भयंकर घटना म्हणजे ऑस्ट्रियाच्या राजपुत्र आर्च ड्युक फ्रान्सीस फर्डिनांड व त्याची पत्नी यांच्या खून हे दोघेही बोस्नियाच्या प्रांताची राजधानी सरजेव्हो ह्या ठिकाणी गेले असताना त्याचा गैरसमजात खून करण्यात आला (२९ जून १९१४) ह्या खुनामुळे संपूर्ण युरोपात एकदम निषेधाची व प्रक्षोभाची लाट निर्माण झाली. ऑस्ट्रियन सरकारने ह्या ~~प्रक्षोभाची लाट निर्माण झाली~~ खुनाला सर्बियाला जबाबदार धरले. सर्बियाने खुनाची जबाबदारी नाकारली त्यामुळे ऑस्ट्रियाने २८ जुलै १९१४ रोजी सर्बियाविरुद्ध युद्ध पुकारले व अशा रितीने पहिल्या महायुद्धाला तोंड लागले.

10/20

"ज्ञान, विज्ञान आणि सुसंस्कार यांसाठी शिक्षण प्रसार"
– शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे

Signature of Supervisor

Shri Swami Vivekanand Shikshan Sanstha's
**VIVEKANAND COLLEGE (Autonomous), KOLHAPUR**

20/9/2020

Class B.A. II Div SEM-4 Roll No. 5022

Suppliment No. Subject History Paper - V

Test / Tutorial No. Srushti Sanjay Chalake

प्र. पहिल्या महायुद्धाचे कारणांचे चिकित्सक परिक्षण करा.

→ प्रस्तावना -

मानवाच्या आतापर्यंतच्या इतिहासात २०वे शतक हे संघर्षमय शतक ठरले गेले. कारण या शतकाची सुरुवातच भयंकर अशा स्वरुपाच्या पहिल्या महायुद्धाने झाली.

1914-1918 या काळात पहिले महायुद्ध लढले गेले. हा प्रदीर्घ कालखंड, व्यापकता, शस्त्रास्त्रे, २८ देशांचा सहभाग, लष्कराबरोबर नागरीकांचा सहभाग, प्रचंड जीव व वित्तहानी इ. घटकामुळे याला महायुद्ध म्हणतात. या महायुद्धात इंग्लंड, फ्रान्स, रशिया, अमेरिका, जपान इ. देशाविरुद्ध जर्मनी, ऑस्ट्रिया, तुर्कस्थान, बल्गेरीया या दोन गटांमध्ये हे युद्ध झाले. त्यात शेवटी 1918 साली जर्मनीचा पराभव होवून हे युद्ध संपले. पहिल्या महायुद्धाची कारणे पुढीलप्रमाणे-

1) युरोपमधील दोन प्रबळ गट -

बिस्मार्कने मुत्सद्देगीरिने व कुटनीतीच्या जोरावर जर्मनीचे एकीकरण यशस्वी केले. अनेक आंतरराष्ट्रीय करार करुन जर्मनीला सहानुभूती तर फ्रान्सला एकाकी पाडण्याचा सतत प्रयत्न केला. यातून या देशांचा 'त्रिराष्ट्र मैत्री करार' केला. परंतु त्यानंतर कैसर विल्यमच्या आक्रमक धोरणामुळे विरोधी देश एकमेकांना सहकार्य करु लागले. त्यातून रशिया, फ्रान्स, इंग्लंड मैत्री करार झाले. यांचा 'त्रिराष्ट्र मित्र संघ' उभारला गेला. अशा प्रकारे २० व्या शतकाच्या प्रारंभी त्रिराष्ट्र मैत्री करार व त्रिराष्ट्र मित्र संघ असे २ प्रबळ गट युरोपात तयार झाले.

२) जर्मनीचे आक्रमक परराष्ट्रीय धोरण-

जर्मनि या नवोदित युरोपियन राष्ट्राचे परराष्ट्रीय धोरण बिस्मार्कने राबवून युरोपात जैसे थे परिस्थिती ठेवली. पण त्याच्यानंतर कैसर या सत्ताधीशाला तसे धोरण राबविणे अशक्य ठरले. त्याने आक्रमक परराष्ट्रीय धोरण स्विकारले. दुसऱ्या देशाच्या अंतर्गत बाबीत हस्तक्षेप सुरु केला. कैसरने इंग्लंडला आव्हानात्मक अशा नाविक योजना आखल्या, नौदल वाढविले, त्यामुळे इंग्लंड-जर्मनी संघर्ष अटळ बनला. इंग्लंडने अलिप्ततेचे धोरण सोडून 'हुकूमी हस्तक्षेपाचे' धोरण स्वीकारले, कैसरने वसाहतवाद, साम्राज्यवाद, लष्करीकरण असे धोरण राबवण्यास सुरुवात केली. या आक्रमक धोरणामूळे युद्धानुकूल वातावरण तयार होत गेले.

३) युरोपातील लष्करवाद-

महायुद्धापूर्वी युरोपातील परिस्थिती अशांत होती. प्रत्येक देश स्वतः च्या संरक्षणासाठी लष्करी प्रयत्न करु लागला. हे वातावरण लष्करीकरणास अनुकूल ठरले यावर बंधने नव्हती. यासाठी प्रचंड खर्च होऊ लागला. लष्करवाढामूळे युरोपात शस्त्रास्त्रे वाढीची स्पर्धा लागली. जर्मनीने इंग्लंडला आव्हान देवून नौदल वाढीच्या इ.स. 1898 व 1907 साली दोन योजना आखल्या. इंग्लंडने त्याला तसेच उत्तर दि याबाबत मर्यादा घालण्यासाठी हेग येथे २ आंतरराष्ट्रीय परिषदा घेतल्या. पण त्यात अपयश आले, त्याला कैसर कारणीभूत होता. फ्रान्सबरोबर जर्मनीचे शत्रुत्व होतेच. फ्रान्स आपले लष्करीबळ वाढवण्यास सुरुवात केली.

४) नवसाम्राज्यवाद व वसाहती मिळवण्याची स्पर्धा-

औद्योगिक क्रांतीबरोबर इतर कारणामूळे युरोपातील देशांना वसाहती मिळवण्याची गरज निर्माण झाली. त्याचबरोबर वसाहती असणे हे त्यांनी प्रतिष्ठेचे मानले होते. यामध्ये इंग्लंड अग्रेसर होते. युरोपातील इतर देशांनीसुद्धा वसाहती मिळवण्याचे प्रयत्न सु

केले. एकप्रकारे तीव्र स्पर्धा सुरु झाली. वसाहतींच्या या स्पर्धेतून अनेक प्रश्न जटिल बनत गेले. अनेक देशातील शत्रुत्व वाढीस लागले. बाल्कन प्रदेशातील वर्चस्वावरुन रशिया-ऑस्ट्रिया, मोरोक्कोवरुन जर्मनी-फ्रान्स अशी अनेक उदाहरणे सांगता येतील.

5) आत्यंतिक राष्ट्रवाद-

पहिल्या महायुद्धापूर्वी युरोपियन देशांनी आत्यंतिक राष्ट्रवाद स्वीकारल्याचे दिसते. स्वतःच्या देशाबद्दल प्रेम म्हणजे दुसऱ्या देशाच्या द्वेष असे राष्ट्रवादाला विकृत व अतिरेकी स्वरुप दिले होते. विशेषतः हे धोरण जाणिवपूर्वक जर्मन जनतेच्या मनावर बिंबवले गेले. जर्मनीबद्दल राष्ट्राभिमान म्हणजे फ्रान्स व इंग्लंडचा द्वेष अशाच जर्मन जनतेची भावना होत गेली. त्याचे त्याउलट फ्रान्स व इंग्लंडमध्ये परिणाम होवून जनतेच्या जर्मनीविरुद्ध भावना तयार झाल्या.

6) वृत्तपत्रे तसेच युद्धानुकूल तत्वज्ञान -

वृत्तपत्र म्हणजे मानवी मनाचे प्रतिबिंब' होय. परंतू महायुद्धापूर्वी युरोपातील वृतपत्रांनी भडकपणे, विपर्यस्त, अतिशयोक्तीपूर्ण लिखाण केले. आंतरराष्ट्रीय स्वरुपाच्या सभा, बैठका, चर्चा इ. बाबत विपर्यस्त लिखाण केले गेले. जनतेपूढे सत्य, निकोप लिखाण येण्याऐवजी शत्रूराष्ट्राविषयी द्वेष, संताप निर्माण होईल असे लिखाण केले.

बिस्मार्कने जर्मनीच्या एकीकरणासाठी लोकशाहीचा नव्हे तर युध्दाचा मार्ग योग्य व आवश्यक सांगितला. कैसरने युध्द व आक्रमक धोरण राबविले. रस्किन म्हणतो युद्धातून राष्ट्राचा जन्म तर शांततेत शेवट होतो, तेव्हा इंग्लंडने युद्धाला तयार व्हावे. अशा प्रकारचे तत्वज्ञान पसरवले गेले.

7) काही गंभीर प्रादेशिक प्रश्न -

युरोपातील अस्थिर परि-

-स्थितीत काही स्फोटक प्रादेशिक प्रश्नांनी अधिक भर घातली. इटलीची ट्रेंटिनो व ट्रिस्ट बंदर व भोवतालचा प्रदेश ऑस्ट्रियाच्या वर्चस्वाखाली होता. तो मिळवण्यासा-ठी इटली प्रयत्नशील होता. दुसरा प्रश्न म्हणजे अल्सेस-लॉरेन फ्रान्सचा प्रदेश १८७०-७१ साली बिस्मार्कने जर्मनी-स जोडला होता. तेथील बहुतांश जनता फ्रेंच होती. प्रदेश समृद्ध होता. बिस्मार्कने फ्रान्सवर केलेला हा अन्याय होता. यावरून फ्रान्स-जर्मनीतील शत्रुत्व वाढत गेले.

८) आंतरराष्ट्रीय संघटनेचा अभाव -

राष्ट्राराष्ट्रातील समस्या सोडविण्यासाठी आज संघटना व कायदे आहेत. त्यांचे पालन केले जाते. पहिल्या महायुद्धापूर्वी जगात तशी व्यवस्था नव्हती. आंतरराष्ट्रीय करार मोडल्यास किंवा बलिष्ठाने दुबळ्या देशावर अन्याय, आक्रमण केल्यास दाद मागण्याची व्यवस्था नव्हती. प्रत्येक राष्ट्र स्वतःच्या इच्छेप्रमाणे वागत असे. १८९९ व १९०७ साली दोन शांतता परिषदा झाल्या होत्या. त्यामध्ये आंतरराष्ट्रीय कायदे-संहिता यशस्वी ठरली असती. पण तसे न होता 'बळी तो कान पिळी' या न्यायाने देश वागले.

९) बाल्कन प्रदेश -

बाल्कन प्रदेशात अनेक देशांचे हित-संबंध होते. त्यामुळे तो प्रश्न गुंतागुंतीचा बनला होता. विशेषतः रशिया व ऑस्ट्रियामध्ये मोठी स्पर्धा होती. बाल्कन प्रदेशातील मॅसिडोनियाच्या वर्चस्वावरून सर्बियाला रशि-याने पाठिंबा दिला, तर ऑस्ट्रिया व जर्मनीने विरोध केला. बाल्कन मधील स्लाव वंशिय लोकांचे एकत्रिकरण करण्याचा सर्बिया प्रयत्न करीत होता तर ऑस्ट्रिया विरोधी होता. १८७८ साली बर्लिन परिषदेने बाल्कनमधील बोस्निया व हर्जेगोविना या स्लाव प्रदेशाचा राज्यकारभार ऑस्ट्रियाकडे सोपविला. १९०८ साली ऑस्ट्रियाने हे दोन्ही प्रांत आपल्या साम्राज्यात विलिन केले. सर्बियाने त्याला विरोध केला. रशियाने सर्बियाला बिनशर्त

ESTD 1984

" ज्ञान, विज्ञान आणि सुसंस्कार यांसाठी शिक्षण प्रसार "
- शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे

Signature of Supervisor

Shri Swami Vivekanand Shikshan Sanstha's
VIVEKANAND COLLEGE (Autonomous), KOLHAPUR

Class ______ Div ______ Roll No. ______

Suppliment No. ______ Subject ______

Test / Tutorial No. ______

पाठिंबा दिला. त्यामुळे बाल्कन प्रश्न गंभीर बनला. 1912-13 मध्ये बाल्कन युध्दे झाली. सर्बियाला शह देवून बाल्कनमध्ये वर्चस्व वाढविण्याचा जर्मनी-ऑस्ट्रियाचा प्रयत्न चालू राहिला.

10) तात्कालिक कारण- आर्च ड्युक फर्डिनांडचा खून-

बाल्कन प्रश्नावरुन ऑस्ट्रिया-सर्बिया यांच्यातील शत्रुत्व वाढत गेले. 28 जुन 1914 रोजी ऑस्ट्रियाचा राजपुत्र आर्च ड्युक फर्डिनांड आपल्या पत्नीसह बोस्नियाची राजधानी सेरेजोव्ह येथे गेला होता. तेथे एका दहशतवादी संघटनेने त्याचा खून केला. सर्बियाने त्यासाठी शस्त्र पुरवली, चिथावणी दिली असा ऑस्ट्रियाने आरोप केला आणि 48 तासांची मुदत सर्बियाला दिली. जर्मनीने ऑस्ट्रियाला तर रशियाने सर्बियाला पाठिंबा दिला. दरम्यान युध्द टाळण्याचे काही प्रयत्न झाले. पण ऑस्ट्रियाने ताठर भूमिका घेतली आणि 28 जुलै 1914 रोजी सर्बियाविरुध्द युध्द पुकारले. यातून पहिले महायुध्द सुरु झाले.

मूल्यमापन -

1914 साल जर्मनीला अनेक आघाड्यावर लाभदायक ठरले. रशियाची परिस्थिती बिकट होत जावून जर्मनीकडून रशियाचा पराभव होवू लागला. 1915 साली सागरी लढाई सुरु झाली. शेवटी नोव्हेंबर 1918 मध्ये जर्मनीने शरणागती पत्करली. अशा प्रकारे जे भूमि, ~~का~~ आकाश, समुद्र अशा तीन्ही ठिकाणी लढलेले महायुध्द 1918 साली संपले.

97

10/10

Page No.
Date

class : BA II Div : — Roll No : 5138

subject : इतिहास

20/9/2020

Name : ऋत्विक राजेंद्र कोळी.

प्र 1. पहिल्या महायुद्धाच्या कारणांचे चिकित्सक परिक्षण करा.

→ बिस्मार्कच्या प्रयाणानंतर युरोपमध्ये परस्पर अविश्वासाचे व स्पर्धेचे वातावरण निर्माण झाले व परिणामी त्यातूनच प्रत्येक राज्यात शस्त्र स्पर्धा निर्माण झाली. ह्या शस्त्रस्पर्धेचा परिणाम महायुद्धात घडून आला. अशारीतीने जर्मनी व इटली ह्या राष्ट्रांचा उदय झाल्यानंतर युरोपच्या राजकारणात जे स्पर्धेचे वातावरण निर्माण झाले त्यातूनच हे महायुद्ध घडून आले.

पहिले महायुद्ध अतिशय विनाशकारी ठरले. ते जवळजवळ १५६५ दिवस म्हणजे ४ वर्षे चालले होते. त्यात जवळजवळ ६५ कोटी लोकांनी भाग घेतला व १७ कोटी लोक त्यात ठार झाले. २२ कोटी जखमी झाले, व ७ कोटी लोक कायमचे पंगू झाले. पहिले महायुद्ध इतक्या विशाल प्रमाणावर झालेल्या ते कोणत्या परिस्थितीत निर्माण झाले किंवा ते होण्यास कोणती कारणे घडून आलीत ते कारणे पाहणे आवश्यक ठरते.

पहिल्या महायुद्धाची कारणे :-

① दोन परस्पर विरोधी गट -

युरोपात गटबाजीचे राजकरण बिस्मार्कच्या काळापासून म्हणजे इ.स. १८७० पासून उदयाला आलेल्या आपल्याला दिसते. जर्मनीचे एकीकरण टिकवून ठेवण्याकरिता बिस्मार्क कोणतेही नैतिक संकेत न मानता युरोपातील कोणत्याही राष्ट्रांशी मैत्री करायला तयार होता. बिस्मार्कच्या 'फोडा आणि झोडा' ह्या धोरणामुळे युरोपातील देश दोन गटात विभागल्या जाऊन हे दोन्ही गट एकमेकांशी संघर्ष करण्यास उत्सुक बनले. बिस्मार्कच्या आपल्या कारकिर्दीत रशिया आणि फ्रांन्स यांना एकमेव मैत्री करण्यापासून परावृत्त केले होते. परंतु बिस्मार्कच्या मृत्युनंतर राजकीय वातावरणात आमुलाग्र बदल घडून आले.

COLLEGE ESTD 1964 Autonomous

युरोप दोन सशस्त्र गटात विभागल्या गेला व त्या दोहोत परस्पर द्वेष, असूया, स्पर्धा आणि प्रखर तेढ असल्याने त्याची परिणती पहिल्या महायुद्धात घडुन आली.

② असुरक्षिततेच्या भावनेतुन निर्माण झालेली लष्करी स्पर्धा :-
दोन परस्परविरोधी गट युरोपात अस्तित्वात असताना त्यांना एकमेकांची भीती वाटणे साहजिकच होते. युद्धाचा उद्भव केव्हाही होणे शक्य असल्याने प्रत्येक राष्ट्राने शस्त्रसज्ज होण्याची स्पर्धा चालविली. त्यामुळे प्रत्येक राष्ट्राचा लष्करावरचा खर्च मोठ्या प्रमाणात वाढल्या त्यामुळे युरोपात अनिर्बंध लष्करीकरणाची लाट निर्माण होवून त्याची परिणती महायुद्धात घडुन आली.

③ राष्ट्रवादाची प्रखर भावना व त्यातून निर्माण झालेल्या विकृती :-
अमेरिकन स्वातंत्र्य युद्ध, फ्रेंच राज्यक्रांती इ. विविध घटनांनी राष्ट्रवादाला जन्म दिलेल्या होता. एक भाषा, एक संस्कृती असणाऱ्या लोकांचे एक राष्ट्र असले पाहिजे ही भावना नैसर्गिक होती व म्हणूनच त्यातूनच जर्मनी, इटलीसारख्या राष्ट्र राज्यांचा उदय झाला. परंतू पलीकडे राष्ट्रनिष्ठा, राष्ट्रप्रेम यांना मोल विकृत अर्थ आला. परंतू पलीकडे राष्ट्रनिष्ठा, राष्ट्रभावनेचे पुरेपूर उपयोग करुन घेऊन परस्परांच्या द्वेष भावनेला मोठे खतपाणी घातले. शासकांनी अतिरेकी राष्ट्रभावनेला आवर न घातल्याने त्यातून महायुद्ध उद्भवले.

④ आर्थिक वर्चस्वाची अभिलाषा :-
19 व्या शतकात जुना वसाहतवाद याला जाऊन त्याची जागा आता नविन साम्राज्यवादाने घेतली. औद्योगिक क्रांती नंतर उत्पादनाच्या तंत्रात आमुलाग्र क्रांती घडुन येताच यंत्राच्या साहाय्याने मोठ्या प्रमाणात उत्पादन होवू लागले त्यामुळे युरोपातल्या प्रत्येक राष्ट्राला आपल्या देशात निर्माण झालेल्या जास्तीत जास्तीच्या मालाकरीता नवीन बाजारपेठांची आवश्यकता वाटु लागली. अशा रितीने मोठ्या आर्थिक साम्राज्यवाद निर्माण होवून त्याचे रुपांतर एकमेकांच्या द्वेषभावनेत झाले. आर्थिक वर्चस्व निर्माण करणाऱ्या प्रयत्नातून महायुद्ध निर्माण झाले.

(5) वृत्तपत्रीय एकांगी विखारी प्रचार :-

ह्या काळात एकमेकांना एकमेकांविषयीची मने आणोदरच्या कलुषित झालेली होती, त्यात वैरभावना पेटविण्याचे कार्य दुर्दैवाने वृत्तपत्रातील एकांगी प्रचाराने केले. प्रत्येक राष्ट्रातील वृत्तपत्रांनी राष्ट्रभावनेवर जोर देऊन राष्ट्रीय भावना चेतावीण्याचा सतत प्रयत्न केला.

(6) युरोपीय पूर्वग्रह दूषित मन :-

वृत्तपत्रांनी सतत केलेल्या जहाल प्रचारामुळे राजकारणी लोकांनी केलेल्या विकृत प्रचारामुळे युरोपीय जनमत प्रक्षुब्ध बनले व त्याचे संतुलन बिघडले. त्यातच राजकारणात प्रामाणिकपणा व सचोटी यांना अर्थ न उरल्याने युरोपीय मन प्रत्येक प्रश्नाकडे पूर्वग्रहदूषित दृष्टीनेच पाहू लागले. एका दृष्टीने युरोपीय मनात विकृती निर्माण झाली व त्याचेच पर्यवसान महायुद्धात घडून आले.

(7) राजकारणातील गुप्ततेची वाटचाल :-

ह्या कालखंडातील आंतरराष्ट्रीय राजकारणाचे आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे त्यातील कमालीची गुप्तता पुष्कळदा राजप्रमुख स्वतःच्या मंत्रिमंडळाला अंधारात ठेवून इतर देशांशी गुप्त करार करीत असे ह्या राजकारणातील गुप्ततेमुळे परस्पर अविश्वास आणि संशय निर्माण झाला. त्यामुळे अस्थिरता निर्माण होऊन महायुद्धात झाला.

(8) तत्त्वज्ञानांची शिकवण :-

ह्या काळात हेगेल आणि जे तत्त्वज्ञ होऊन गेले त्यांच्याही तत्त्वज्ञानाचा मोठा सखोल परिणाम जर्मन तरुणांवर घडून आला. हेगेलने राष्ट्र म्हणजे परमेश्वर अशी शिकवण देऊन राष्ट्राकरीता व्यक्तीने आत्मसमर्पण करण्याकरीता सतत तयार असावे असा पुरस्कार केला. ह्या सर्व तत्त्वज्ञानाचा परिणाम म्हणजे जर्मन जनता युद्धावर मनापासून श्रद्धा ठेवू लागली व त्यातूनच पहिले महायुद्ध उद्भवले.

VIVEKANAND COLLEGE KOLHAPUR ESTD JUNE 1964 (Autonomous)

(७) तत्कालिन कारण :-

आर्चडयुक फर्डिनंडचा खून :-

अशा रीतीने उभय पक्षात वैमनस्य पेटले असताना आणि संपूर्ण युरोपात विलक्षण तणावाचे व संशयाचे वातावरण निर्माण झाले असताना ह्या वातावरणात एक भयंकर घटनेची ठिणगी पडली ती भयंकर घटना म्हणजे ऑस्ट्रियाचा राजपुत्र आर्चडयुक फ्रान्सिस फर्डिनंड व त्याची पत्नी यांचा खून. हे दोघेही बोस्निया प्रांताची राजधानी सेराजेवो ह्या ठिकाणी गेले असताना त्यांचा मारेकऱ्यांनी खून करण्यात आला (२९ जून १९१४). ह्या खूनामुळे संपूर्ण युरोपात एकच निषेधाची व संशयाची लाट निर्माण झाली. ऑस्ट्रियन सरकारने ह्या खूनाला सर्बियाला जबाबदार धरले. सर्बियाने खूनाची जबाबदारी नाकारली. त्यामुळे ऑस्ट्रियाने २३ जुलै १९१४ रोजी सर्बियाविरुद्ध युद्ध पुकारले व अशा रीतीने पहिल्या महायुद्धास तोंड लागले.

1

10/10

# Home - Assignment.

Name : Aashlesha Sanjay Nangnurkar.
Std - B.A II
Sub - History V
Roll No - 5180 20/9/2021

प्रश्न - पहिल्या महायुद्धाच्या कारणांचे चिकीत्सक परिक्षण करा.

⟹ प्रस्तावना -

विसाव्या शतकाला जगाच्या इतिहासात संघर्षाचे शतक म्हणून ओळखले जाते. या शतकात जे संघर्ष घडून आले त्या संघर्षाला जागतिक दृष्टीकोनातून महत्वाचे स्थान प्राप्त झाले होते. विसाव्या शतकाच्या सुरुवातीला म्हणजेच इ.स. 1914 ते 1918 मध्ये पहिले महायुद्ध घडून आले. या महायुद्धासारखे सर्वव्यापी नव्हते; पहिले महायुद्ध हे अभूतपूर्व असून सर्वार्थाने ते महायुद्ध किंवा जागतिक युद्ध होते. हे महायुद्ध विशिष्ट अशा एकाच ठिकाणी लढले नाही तर ते जमीन, पाणी व आकाश इ. ठिकाणी तसेच आफ्रिका, आशिया आणि युरोप या तीन खंडात लढले. अशा या महायुद्धाची कारणे पुढीलप्रमाणे -

1) अतिरेकी राष्ट्रवाद -

विशेषत: आपल्या राष्ट्रावर प्रेम करणे किंवा देशभक्ती म्हणजेच राष्ट्रवाद होय. राष्ट्राच्या प्रगतीसाठी राष्ट्रवाद आवश्यकच असतो. परंतु आपल्या राष्ट्राच्या प्रगतीसाठी दुसऱ्या राष्ट्राला कमी लेखणे, त्यांचे स्वातंत्र्य हिरावून घेणे आणि त्या देशाची पिळवणूक करणे याला अतिरेकी राष्ट्रवाद असे म्हणतात. या अतिरेकी राष्ट्रवादाने पहिल्या महायुद्धाला हातभार लावला होता.

2) युरोपची दोन गटात विभागणी -

बिस्मार्कने 1871 मध्ये फ्रान्सचा पराभव करून जर्मनीचे एकीकरण पूर्ण केले. त्याने फ्रान्सच्या ताब्यातील आल्सेस व लॉरेन हे दोन प्रांत हस्तगत करून फ्रान्सचा

ESTD JUNE 1962 (college stamp)

अशोभी अपमान केला होता. त्यामुळे फ्रान्स आपणाला माफ करणार नाही, तो आपणावर सुड उगविणार याची बिस्मार्कला खात्री होती. यासाठी त्याने युरोपच्या राजकारणात अनेक परस्पर विरोधी असे करार घडवून आणले. त्याने प्रथम तीन सम्राटांचा संघ तयार करून फ्रान्सविरुद्ध करार घडवून आणले. तरि त्रिमैत्री करार करून ऑस्ट्रिया, जर्मनी आणि इटली यांचा एक संघ तयार केला. बिस्मार्कनंतर कैसर विल्यमला बिस्मार्कची संघपद्धती यशस्वीपणे राबविता आली नाही. परिणामी जर्मनीच्या आक्रमक धोरणाला पायबंद घालण्यासाठी आपापसातील मतभेद विसरून फ्रान्स, इंग्लंड आणि रशिया यांच्यात मैत्री करार घडून आला. अशाप्रकारे त्रिराष्ट्र मैत्री कराराला प्रत्युत्तर देण्यासाठी युरोपमध्ये त्रिमित्र राष्ट्रसंघ निर्माण झाला. त्यामुळे युरोप परस्परविरोधी दोन गटात विभागला गेला.

### ३) गुप्त राजनिती -

बिस्मार्कने युरोपच्या राजकारणात गुप्त राजनीतीचा पाया घातल्यामुळे १९ व्या शतकापासून जागतिक राजकारणात संशयाचे आणि अविश्वासाचे वातावरण निर्माण झाले. त्यामुळे सार्वजनिक सुरक्षितता धोक्यात येऊन युरोपातील प्रत्येक राष्ट्राला दुसऱ्या राष्ट्राच्या आक्रमणाची भीती वाटू लागली. यातूनच अनेक राष्ट्रांनी स्वसंरक्षणासाठी इतर राष्ट्रांबरोबर लष्करी करार घडवून आणले. तथापि हे करार इतके गुप्त ठेवलेले होते की बऱ्याच वेळा संबंधित राष्ट्राच्या मंत्रीमंडळाच्या सदस्यांना देखील त्या कराराबद्दल काहीच माहित नसे. अशा प्रकारच्या गुप्त राजनीतीमुळे आंतरराष्ट्रीय राजकारण गढूळ होऊन युद्धजन्य परिस्थिती निर्माण झाली.

### ४) युरोपातील लष्करीकरण -

युरोपच्या राजकारणात गुप्त राजनीतीचा उदय झाल्यामुळे राष्ट्रां-राष्ट्रांत संशयाचे व भितीचे वातावरण निर्माण झाले. त्यामुळे प्रत्येक राष्ट्राने दुसऱ्या राष्ट्राच्या आक्रमणापासून सुरक्षित राहण्यासाठी आपल्या राष्ट्राचे लष्करीकरण करण्यास सुरुवात झाली. सक्तीची सैन्यभरती व लष्करी शिक्षण, प्रचंड प्रमाणावर शस्त्रास्त्रांची निर्मिती करण्यास प्राधान्य देण्यात आले. लष्कराच्या प्रत्येक क्षेत्रात सर्वच युरोपियन राष्ट्रांनी आपले सामर्थ्य वाढविले. शस्त्रास्त्रांची स्पर्धा सुरू

झाली. अशाप्रकारे युरोपातील लष्करीकरणामुळे युरोपला युद्ध छावणीचे स्वरूप प्राप्त झाले.

5) आर्थिक साम्राज्यवाद.

19 व्या शतकात युरोपियन राष्ट्रांनी युरोप, आशिया आणि अफ्रिका खंडात साम्राज्यविस्तार करण्यास सुरुवात केली. या आर्थिक साम्राज्यवादाला प्रामुख्याने औद्योगि क्रांतीने हातभार लावला होता. आपल्या देशाच्या औद्योगिक विकासासाठी कच्चा मालाचा पुरवठा व हक्काची बाजारपेठ मिळावी म्हणून प्रत्येक राष्ट्र वसाहती मिळवण्यासाठी प्रयत्न करु लागले. यातूनच वसाहतीसाठी स्पर्धा सुरु होऊन राष्ट्राराष्ट्रांत द्वेषाची व मत्सराची भावना वाढीस लागली.

6) आंतरराष्ट्रीय संघटनेचा अभाव.

या काळात सर्वच राष्ट्रां वर नियंत्रण ठेवणारी कोणतीही आंतरराष्ट्रीय संघटना नव्हती या काळात राष्ट्रा-राष्ट्रातील वाद सोडविण्यासाठी आंतरराष्ट्री कायदा होता परंतु आंतरराष्ट्रीय संघटनेच्या अभावी त्याची अंमलबजावणी होत नव्हती. प्रत्येक राष्ट्र स्वत:ला श्रेष्ठ समजू लागले. सामर्थ्यवान राष्ट्रे अधिकच आक्रमक बनली. बड्या राष्ट्रांच्या या आक्रमक प्रवृत्तीमुळे दुर्बल राष्ट्रांत संशयाचे वातावरण वाढीस लागून पहिले महायुद्ध उद्भवले.

7) वंशिक श्रेष्ठता.

19 व्या शतकाच्या उत्तरार्धात राष्ट्रीय भावनेचा विकास होऊन विशिष्ट वंशाच्या, भाषेच्या लोकांना एका ध्वजाखाली आणण्याचे प्रयत्न सुरु झाले. भिन्न वंशीय लोक निरनिराळ्या प्रदेशात विखुरल्यामुळे ते सहजासहजी एकत्र येऊ शकत नव्हते. त्यासाठी युद्धाचा मार्ग स्वीकारला गेला. अशाप्रकारच्या वंश श्रेष्ठत्वाच्या कल्पनेतून इतरांचा द्वेष करण्याची वृत्ती वाढीस लागली. यातूनच श्रेष्ठ - कनिष्ठ अशा विघातक प्रवृत्ती उदयास येऊन युरोपात तणाव निर्माण झाला. ही वंशश्रेष्ठत्वाची कल्पनेतून इतरांचा द्वेष वाढीस लागला.

VIVEKANAND COLLEGE KOLHAPUR (Autonomous) ESTD JUNE 1964

### ८) युद्ध तत्वज्ञाचा प्रसार-

युरोपमध्ये अनेक विचारवंतांनी आपल्या देशाच्या प्रगतीसाठी युद्ध आवश्यक असते अशाप्रका[र] युद्ध तत्वज्ञान मांडले, आणि लोकांना युद्धाच्या भावनेने प्रेरित केले. इंग्लंडने आरमारी सामर्थ्याच्या जोरावर जगा[त] वर्चस्व मिळविले, या विचारांचा तत्ववेत्त्यांनी पाठपुरावा केला. जर्मनी तत्वज्ञ निश्ते यांनी युद्धाची मानव समाजाला विस्[मृती] पडली तर त्याचा उत्कर्ष होणार नाही असे मत मांडून जर्म[न] समाजाला युद्धासाठी प्रवृत्त केले.

### ९) कैसर विल्यमची महत्वकांक्षा.

जर्मनीला जगात अत्यंत महत्वाचे आणि सर्वश्रेष्ठ स्थान मिळवून देण्याची जर्मन सम्राट कैसर विल्यमची महत्वकांक्षा होती. त्याने आरमाराच्या जोरावर प्रचंड साम्राज्यविस्तार करणे आणि जर्मनीला जागति[क] राजकारणात महत्व मिळवून देणे हे आपले प्रमुख कर्तव्य मानले. त्यामुळे जर्मनीला जागतिक राजकारणात अनेक शत्रू निर्माण झाले. । केवळ जर्मनीलाच जगावर राज्य करण्याचा अधिकार आहे असे तो नेहमी म्हणत असे. त्याची अघोरी महत्वाकांक्षा पहिल्या महायुद्धास कारणीभूत ठरली.

### १०) बाल्कन प्रश्न-

पुर्वेकडे तुर्कीचे वैभवसंपन्न असे तुर्की साम्राज्य होते. तथापि १९ व्या शतकात या तुर्की साम्राज्याला उतरती कळा लागताच युरोपातील अनेक राष्ट्रांनी तुर्की साम्राज्याचे लचके तोडण्यास सुरुवात केली. सुलतानांनी अशा चळवळी दडपून टाकण्याचा प्रयत्न करताच आपल्या धर्माच्या व वंशाच्या ख्रिस्चन लोकांचे संरक्षण करण्यासाठी रशियाने बाल्कन प्रदेशात हस्तक्षेप केला. रशियाचे बाल्कन प्रदेशात वर्चस्व वाढल्यास आपल्या भारतातील व्यापारास धोका निर्माण होईल याची भिती वाटू लागली. यातून संघर्षाचे वातावरण निर्माण झाले.

### ११) वृत्तपत्रांचा भडक प्रचार-

वृत्तपत्रांना समाज जागृतीचे महत्वाचे साधन मानले जाते. वास्तविक वृत्तपत्रांनी वस्तुनिष्ठ

समतोल दृष्टीकोन ठेवून लेखन करणे आवश्यक असते. परंतू युरोपमध्ये युद्धजन्य परिस्थिती असताना वृत्तपत्रांनी प्रतिस्पर्धी राष्ट्राविषयी भडक, विकृत आणि अतिरंजित बातम्या प्रसारित करून राष्ट्र-राष्ट्रात तणाव निर्माण केला.

(२) तात्कालिक कारण -

इ.स. १९०८ साली ऑस्ट्रियाने बोस्निया व हर्जेगोव्हिना हे दोन प्रांत आपल्या साम्राज्यात विलीन केल्यामुळे ऑस्ट्रिया, हंगेरी व सर्बिया यांच्यातील शत्रुत्व तीव्र बनले. बाल्कन युद्धात सर्बियाला बरेच यश मिळाले होते, त्यामुळे सर्बियाचे सामर्थ्य वाढले होते. बोस्निया व हर्जेगोव्हिना प्रांतावरून झाला ऑस्ट्रियाबाबत सर्बिया मनात राग धरून होता. स्लाव्ह वंशियांचे एक राष्ट्र बनविण्यासाठी सर्बियात अनेक गुप्त व क्रांती-कारक संघटना स्थापन झाल्या होत्या. ऑस्ट्रियाच्या युवराज आर्च ड्युक फर्डिनांड हा आपल्या नव-वधूसह बोस्नियात येणार होता म्हणून संघटनांनी आपले लक्ष ऑस्ट्रियन राजपुत्रावर केंद्रित केले. या कटवाल्यांना दारुगोळा व इतर साधने, माहिती सर्बियन सरकारने पुरविली. २८ जून १९१४ रोजी आर्च ड्युक आपल्या पत्नीसह बोस्नियाची राजधानी साराजेव्होला भेट देण्यासाठी आला. तेव्हा त्याचा खून केला. या खुनाची बातमी वाऱ्यासारखी जगभर पसरली. या घटनेस ऑस्ट्रियाने सर्बियन सरकारला जबाबदार धरले. त्यामुळे ऑस्ट्रियात सर्बियाविरुद्ध क्रोधा-ग्नी भडकला.

अशा प्रकारे, पहिल्या महायुद्धाला वरीलपैकी कारणे कारणीभूत ठरली.

COLLEGE KOLHAPUR ESTD JUNE 1964 (Autonomous)

10

"ज्ञान, विज्ञान आणि सुसंस्कार यांसाठी शिक्षण प्रसार"
- शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे

Signature of Supervisor

Shri Swami Vivekanand Shikshan Sanstha's
**VIVEKANAND COLLEGE (Autonomous), KOLHAPUR**

20/9/2020

Class B.A II Div ______ Roll No. 5254

Suppliment No. Varsha Ananda Ranage Subject History

Test / Tutorial No. paper No - V - आधुनिक युरोप

प्र. पहिल्या महायुद्धाच्या कारणांचे चिकित्सक परीक्षण करा.

→ प्रस्तावना :

मानवाच्या आतापर्यंतच्या इतिहासात २० वे शतक हे संघर्षमय शतक ठरले गेले. कारण या शतकाची तुलनात्मक भयंकर अशा पहिल्या युद्धाने झाली. इ. स. १९१४ ते १९१८ या काळात पहिले महायुद्ध लढले गेले. हा प्रदीर्घ कालखंड, व्यापकता, शस्त्रास्त्रे, २८ देशांचा सहभाग, लष्कराबरोबर नागरिकांचा सहभाग, प्रचंड जीव व वित्तहानी इ. घटकामुळे यास महायुद्ध म्हणतात. या महायुद्धात इंग्लंड, फ्रान्स, रशिया, अमेरिका, जपान इ. देशाविरुद्ध जर्मनी, ऑस्ट्रिया, तुर्कस्थान, बल्गेरिया असून दोन गटामध्ये हे युद्ध झाले. त्यात शेवटी १९१८साली जर्मनीचा पराभव होवून हे युद्ध संपले. महायुद्धाची कारणे पुढील प्रमाणे :

१) युरोपमधील दोन प्रबळ गट :

जर्मनी, ऑस्ट्रिया व इटली या देशांचा "त्रिराष्ट्र मैत्री करार" केला. त्याने युरोपातील सत्तेचा समतोल साधण्यात यश मिळवले. त्यांच्या आक्रमक धोरणामुळे विरोधी देश एकमेकांना सहकार्य करु लागले. त्यातून १८९३ साली रशिया - फ्रान्स मैत्री करार १९०४ साली इंग्लंड मैत्री करार झाला. याप्रमाणे हे तीन देश एकत्र आले आणि त्यांचा त्रिराष्ट्र मित्र संघ उभारला गेला. अशा प्रकारे २० व्या शतकाच्या आधी प्राथमिक त्रिराष्ट्र मैत्री करार व त्रिराष्ट्र मित्रसंघ असे दोन प्रबळ गट युरोपात तयार झाले. हे गट [illegible] प्रबळ बनवण्याच्या

VIVEKANAND COLLEGE ESTD JUNE 1964 (Autonomous)

प्रयत्न करीत राहिले. मतभेद, शत्रुत्व वाढत गेले. ही परिस्थिती युद्धाला अनुकूल ठरली.

२) जर्मनीचे आक्रमक परराष्ट्रीय धोरण :

जर्मनी या नवोदित युरोपियन राष्ट्राचे परराष्ट्रीय धोरण बिस्मार्कने मुत्सद्देगिरी राबवून युरोपात येणे थे परिस्थिती हेवली. पण त्यांच्यानंतर कैसर या सत्ताधीशाला हे धोरण राबविणे अशक्य ठरले. त्याने आक्रमक परराष्ट्रीय धोरण स्विकारून देशाला प्रतिष्ठा मिळवण्याचा प्रयत्न केला. दुसऱ्या देशांच्या अंतर्गत बाबीत हस्तक्षेप सुरू केला. बिस्मार्कने इंग्लंडचे नाविक सामर्थ्य व वर्चस्व मान्य केले होते.

३) युरोपातील लष्करवाद :

महायुद्धापुर्वी युरोपातील परिस्थिती अशांत होती. लष्करवादामुळे युरोपात शस्त्रास्त्रे वाढीची स्पर्धा लागली. जर्मनीने इंग्लंडला आव्हान देऊन नौदल वाढीच्या इ.स. १८९८ व १९०७ साली दोन योजना आखल्या. इंग्लंडने त्याला तसेच उत्तर दिले. याबाबत मर्यादा घालण्यासाठी रशियाच्या राजाने हेग येथे दोन आंतरराष्ट्रीय स्पर्धा घेतल्या. पण त्यात अपयश आले, त्याला कैसर अधिक कारणीभुत होता. फ्रान्सबरोबर जर्मनीचे शत्रुत्व होतेच. त्यामुळे फ्रान्सने आपले लष्करीबळ व शस्त्रास्त्रे मोठ्या प्रमाणावर वाढविण्यास सुरूवात केली. जनमत अनुकूल बनविण्याचा जाणिवपुर्वक प्रयत्न केला.

४) नवसाम्राज्यवाद व वसाहती मिळवण्याची स्पर्धा :

औद्योगिक क्रांतीबरोबर इतर कारणामुळे युरोपातील देशांना वसाहती मिळवण्याची गरज निर्माण झाली. त्याचे इंग्लंडला फार मोठे फायदे मिळत होते. त्यामुळे युरोपातील इतर देशांनी सुद्धा वसाहती मिळविण्याचे प्रयत्न सुरू केले. इंग्लंडला हेवा करणारे देश अधिक

अधिक प्रयत्न सुरू केले. करू लागले. एक प्रकारे तीव्र स्पर्धा सुरू झाली. वसाहतींच्या या स्पर्धेतून अनेक प्रश्न जटिल बनत गेले. अनेक देशातील शत्रुत्व वाढीस लागले. किंबहुना पहिल्या महायुद्धाच्या निर्मितीमागे कारणास ही स्पर्धाच कारणीभूत ठरली हे महत्त्वाचे आहे.

5) आत्यंतिक राष्ट्रवाद :

स्वतःच्या देशाबद्दल प्रेम, भक्ती असणे या अर्थाने राष्ट्रवाद योग्य ठरतो. पहिल्या महायुद्धापूर्वी युरोपियन देशांनी आत्यंतिक राष्ट्रवाद स्वीकारल्याचे दिसते. स्वतःच्या देशाबद्दल प्रेम म्हणजे दुसऱ्या देशाचा द्वेष, असे राष्ट्रवादाला विकृत व अतिरेकी स्वरूप दिले होते. जर्मनीबद्दल राष्ट्राभिमान म्हणजे फ्रान्स व इंग्लंडचा द्वेष असेच जर्मन जनतेची भावना होत गेली. त्याचे त्यानंतर फ्रान्स व इंग्लंडमध्ये परिणाम होऊन जनतेच्या जर्मनी-विरुद्ध भावना तयार झाल्या. यातून शत्रुत्व वाढीस लागले.

6) वृत्तपत्रे तसेच युद्धानुकूल तत्त्वज्ञान :

वृत्तपत्रे म्हणजे जनजागृतीचे फार महत्त्वाचे व प्रभावी साधन असते. परंतु महायुद्धापूर्वी युरोपातील वृत्तपत्रांनी भडकपणे, विपर्यस्त, अतिशयोक्तीपूर्ण लिखाण केले, त्यामुळे जनतेत युद्धाची भावना वाढीस लागली. पहिल्या महायुद्धापूर्वी युद्धाला अनुकूल असे तत्त्वज्ञान जनतेला पटवून देण्याचा पद्धतशीर प्रयत्न केला गेला. उदा. बिस्मार्कने जर्मनीच्या एकीकरणासाठी लोकशाही ... तर युद्धाचा मार्ग योग्य व आवश्यक असल्याचे सांगितले.

ESTD JUNE 1964 (Autonomous)

कैसरने युद्ध व आक्रमक धोरण राबविले.

7) काही गंभीर प्रादेशिक प्रश्न :-
युरोपातील अस्थिर परिस्थिती काही स्फोटक प्रादेशिक प्रश्नांनी अधिक भर घातली उदा. इटलीची ट्रेंटिनो व ट्रिस्ट बंदर व भोवतालचा प्रदेश ऑस्ट्रियाच्या वर्चस्वाखाली होता. तो मिळवण्यासाठी इटली प्रयत्नशील होता तर ऑस्ट्रियाचा विरोध होता. त्यामुळे त्या दोन देशात शत्रुत्व होते. दुसरा प्रश्न म्हणजे अल्सेस - लॉरेन्स फ्रान्सचा प्रदेश 1870-71 साली बिस्मार्कने जर्मनीला जोडला होता. येथील बहुतांश जनता फ्रेंच होती.

8) आंतरराष्ट्रीय संघटनेचा अभाव :-
राष्ट्राराष्ट्रांतील समस्या सोडवण्यासाठी आज संघटना व कायदे आहेत. त्यांचे पालन केले जाते. पहिल्या महायुद्धापूर्वी जगात अशी व्यवस्था नव्हती. आंतरराष्ट्रीय करार मोडल्यास। बलिष्ठाने दुबळ्या देशावर अन्याय, आक्रमण केल्यास दाद मागण्याची व्यवस्था नव्हती प्रत्येक राष्ट्र स्वतःच्या इच्छेप्रमाणे वागत असे. 1899 व 1907 साली दोन शांतता परिषदा झाल्या होत्या. त्यामध्ये आंतरराष्ट्रीय कायदेसंहिता यशस्वी करणी आणली पण पाळले न होता 'बळी तो कान पिळी' या न्यायाने देश वागले.

9) बाल्कन प्रश्न :-
बाल्कन प्रदेशातील मॅसिडोनियाच्या वर्चस्वावरून सर्बियाला रशियाने पाठिंबा दिला तर ऑस्ट्रिया व जर्मनीने विरोध केला. 1878 साली बर्लिन परिषदेने बाल्कनमधील बोस्निया व हर्जेगोविना या स्लाव प्रदेशाचा राज्यकारभार ऑस्ट्रियाकडे सोपविला

110

बाल्कन प्रश्नाचे गांभीर्य सांगताना इतिहासकार ग्रँट टेम्पर्ले म्हणतात. "1914 च्या महायुद्धाला बाल्कन युद्धे जितकी कारणीभुत झाली तितकी इतर कोणतीही गोष्ट कारणीभुत झाली नाही.

(७) तात्कालिक कारण – आर्च ड्युक फर्डिनंडचा खुन :

28 जून 1914 रोजी ऑस्ट्रियाचा राजपुत्र आर्च ड्युक फर्डिनांड आपल्या पत्नीसह बोस्नियाची राजधानी सेरेजोव्ह येथे गेला होता. तेथे एक दहशतवादी संघटनेने त्याचा खुन केला. जर्मनीने ऑस्ट्रियाला तर रशियाने सर्बियाला पाठिंबा दिला. दरम्यान युद्ध टाळण्याचे काही प्रयत्न झाले. पण ऑस्ट्रियाने तीव्र भुमिका घेतली आणि 28 जुलै 1914 रोजी सर्बियाविरुद्ध युद्ध पुकारले. यातून पहिले महायुद्ध सुरु झाले.

मुल्यमापन :

पहिले महायुद्ध 1914 ते 1918 असे दीर्घकाळ चालले. शेवटी नोव्हेंबर 1918 मध्ये जर्मनीने शरणागती पत्करली. कैसर हॉलंडला पळून गेला. जर्मनीत सत्तेवर आलेल्या प्रजासत्ताक सरकारने तह मान्य केला. अशा रीतीने भुमी, आकाश, समुद्र अशा तीनही ठिकाणी लढलेले महायुद्ध 1918 झाली संपले.

अशा प्रकारे पहिल्या महायुद्धाचे परीक्षण थोडक्यात स्पष्ट केले आहे.

ESTD JUNE 1964 (Autonomous)

" ज्ञान, विज्ञान आणि सुसंस्कार यांसाठी शिक्षण प्रसार "
- शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे

Signature of Supervisor

Shri Swami Vivekanand Shikshan Sanstha's
**VIVEKANAND COLLEGE (Autonomous), KOLHAPUR**

20/9/2020

Class बी.ए. भाग-दोन Div. ____ Roll No. 5241

Suppliment No. ____ Subject History.

Test / Tutorial No. ____ नाव - आकाश सुभाष पोवार

प्र. पहिल्या महायुद्धाच्या कारणांचे मुल्यमापन करा.

प्रस्तावना -!

मानवाच्या आत्तापर्यंतच्या इतिहासात २० वे शतक हे संघर्षमय शतक ठरले आहे कारण या शतकाची सुरवातच भयंकर अशा स्वरूपाची पहिल्या महायुद्धाची झाली.

1914-1918 या काळात झाले महायुद्ध लढले गेले. ते प्रदीर्घ कालावधीत प्रचंड व्यापकता, शस्त्रास्त्रे, 28 देशांचा सहभाग लष्कराच्या नागरिकांबरोबर समावेश प्रचंड जिवित व वित्त इ. धक्कामुळे यास महायुद्ध म्हणतात. या महायुद्धात इंग्लंड फ्रान्स, रशिया, अमेरिका, जपान इ. देशाविरुद्ध जर्मनि, ऑस्ट्रीया, तुर्कस्तान, बल्गेरिया या दोन राष्ट्रामध्ये हे युद्ध झाले. त्यात 1918 साली जर्मनीचा पराभव होवून युद्धाचा शेवट झाला. अशाप्रकारे सर्वकष व सर्वव्यापी स्वरूप असणारे पहिले महायुद्ध अचानक किंवा एकाकी घडून आले नाही ते 19 व्या शतकात घडलेल्या राजकिय, आर्थिक घडामोडी आणि वैचारिक क्रांती यांचा परिपाक होता. या महान आपत्तीस खालील घटकांनी हातभार लावला.

१) अतिरेकी राष्ट्रवाद

आपल्या राष्ट्रावर प्रेम करणे म्हणजे राष्ट्रवाद होय. राष्ट्राच्या प्रगतिसाठी राष्ट्रवाद आवश्यक असतोच तथापि आपल्या राष्ट्र प्रगतिसाठी दुसऱ्या देशाला कमी लेखणे त्यांचे स्वातंत्र्य हिरावून घेणे आणि त्या विकासाची पिळवणूक करणे यास अतिरेकी राष्ट्रवाद म्हणतात.

112

या अतिरेकी राष्ट्रवादाने पहिल्या महायुद्धाला हातभार लावला. जगावर राज्य करण्याचा आपल्याच राष्ट्राला अधिकार आहे असे अनेक राष्ट्रांना वाटू लागले. अनेक राष्ट्रांना अतिरेकी राष्ट्रांना उदय होऊन राष्ट्राराष्ट्रांत शत्रुत्वाचे संबंध निर्माण झाले. यातूनच जर्मनी, फ्रान्स संघर्ष - इटली, ऑस्ट्रीया - संघर्ष जर्मन - इंग्लंड संघर्ष तुर्कस्तानमधील बाल्कन प्रश्न ऑस्ट्रीया - सर्बिया संघर्ष अशा स्वरूपाचे संघर्ष वाढीस लागले. यामुळे युरोपातील शांतता धोक्यात येऊन युरोप महायुद्धाच्या दिशेने वाटचाल करू लागला.

२) युरोपाची दोन गटात विभागणी :-

बिस्मार्कने मुत्सद्दीगिरीने व कुटनितिच्या जोरावर जर्मनीचे एकीकरण यशस्वी केले. अनेक आंतरराष्ट्रीय करार करून जर्मनीला सहानुभूती तर फ्रान्सला एकाकी पाडण्याचा सतत प्रयत्न केला. यातून या देशांचा त्रिराष्ट्र मैत्री करार केला. परंतु यानंतर कैसर विल्यम च्या आक्रमक धोरणामुळे विरोधी देश एकमेकांना सहकार्य करू लागले. त्यातून रशिया, फ्रान्स, इंग्लंड मैत्री करार झाले. यांचा त्रिराष्ट्र मैत्री संघ उभारला गेला. अशा प्रकारे २० व्या शतकात त्रिराष्ट्र मैत्री करार व त्रिराष्ट्र मैत्री संघ असे दोन प्रबल गट युरोपात तयार झाले.

३) जर्मनीचे आक्रमक परराष्ट्रीय धोरण :-

जर्मनी या नवोदित युरोपियन राष्ट्रांचे परराष्ट्रीय धोरण बिस्मार्कने राबवून युरोपात जैसे-थे परिस्थिती ठेवली. पण त्याच्यानंतर कैसर या सत्ताधीशाला तसे धोरण राबवणे अशक्य झाले. त्याने आक्रमक परराष्ट्र धोरण स्वीकारले. दुसऱ्या देशाच्या अंतर्गत बाबातीत हस्तक्षेप सुरू केला. कैसरने इंग्लंडला आव्हानात्मक अशा नाविक योजना आखल्या. नौदल वाढविले, त्यामुळे इंग्लंड, जर्मनी संघर्ष अटळ बनला. इंग्लंडने अलिप्ततेचे धोरण सोडून एकमेकी हस्तक्षेपाचे धोरण स्वीकारले. कैसरने वसाहतवाद, साम्राज्यवाद, लष्करीकरण

113

असे धोरण राबविण्यास सुरुवात केली.

4) युरोपातील लष्करवाद !-

महायुद्धापूर्वी युरोपातील स्थिती अशांत होती. प्रत्येक देश स्वतःच्या संरक्षणासाठी प्रयत्न करू लागला. हे वातावरण लष्करीकरणास अनुकूल ठरले. यावर बंधने नव्हती यासाठी प्रचंड खर्च होऊ लागला. लष्करवादामुळे युरोपात शस्त्रास्त्रे वाढीची स्पर्धा लागली. जर्मनीने इंग्लंडला आव्हान देऊन नौदल वाढीच्या इ.स. 1897 व 1907 साली दोन योजना आखल्या. इंग्लंडने त्याला तसेच उत्तर दिले. याबाबत मर्यादा घालण्यासाठी हेग येथे 2 आंतरराष्ट्रीय परिषदा घेतल्या. फ्रान्सबरोबर जर्मनीचे शत्रुत्व होतेच, फ्रान्सने आपले लष्करीबल वाढवण्यास सुरुवात केली.

5) नवसाम्राज्यवाद व वसाहती मिळवण्याची स्पर्धा !-

औद्योगिक क्रांतीबरोबर इतर कारणामुळे युरोपातील देशांना वसाहती मिळवण्याची गरज निर्माण झाली, त्याचबरोबर वसाहती असणे हे त्यांनी प्रतिष्ठेचे मानले होते. युरोपातील इतर देशांनीसुद्धा वसाहती मिळवण्याचे प्रयत्न सुरू केले. एकप्रकारे तीव्र स्पर्धा सुरू झाली. वसाहतींच्या या स्पर्धेतून अनेक प्रश्न जटिल बनत गेले. अनेक देशातील शत्रुत्व वाढीस लागले. बाल्कन प्रदेशातील वर्चस्वावरून रशिया-ऑस्ट्रिया मोरोक्कोवरून जर्मनी-फ्रान्स अशी अनेक उदाहरणे सांगता येतील.

6) वृत्तपत्रे तसेच युद्धानुकूल तत्वज्ञान

वृत्तपत्र म्हणजे मानवी मनाचे प्रतिबिंब होय परंतु महायुद्धापूर्वी युरोपातील वृत्तपत्रांनी, भडकपणे, विपर्यास्त, अतिशयोक्तीपूर्ण लिखाण केले. आंतरराष्ट्रीय स्वरूपाच्या सभा, बैठका चर्चा इ. बाबत विपर्यास्त लिखाण केले गेले. जनतेपुढे सत्य, निर्लेप लिखाण देण्याऐवजी शत्रूविषयी द्वेष, संताप निर्माण होईल असे लिखाण केले.

बिस्मार्कने जर्मनीच्या एकीकरणासाठी लोकशाहीचा नव्हे तर युद्धाचा [illegible] योग्य व आवश्यक सांगितला कैसरने युद्ध व आक्रमक धोरण राबविले.

७) काही गंभीर प्रादेशिक प्रश्न :-

युरोपातील अस्थिर परिस्थितीत काही स्फोटक प्रादेशिक प्रश्नांनी आर्थिक भर घातली. इंग्लंडची ट्रेंटिनो व ट्रिस्ट बंदर व भोवतालचा प्रदेश ऑस्ट्रीयाच्या वर्चस्वाखाली होता. तो मिळवण्यासाठी इटली प्रयत्नशील होता. दुसरा प्रश्न म्हणजे अल्सेस लॉरेन्स फ्रान्सचा प्रदेश 1870-71 साली बिस्मार्कने जर्मनीस जोडला होता. तेथील बहुतांश जनता फ्रेंच होती. प्रदेश समृद्ध होता. बिस्मार्कने फ्रान्सवर केलेला हा अन्याय होता. यावरून फ्रान्स व जर्मनीतील शत्रुत्व वाढत गेले.

८) आंतरराष्ट्रीय संघटनेचा अभाव :-

राष्ट्राराष्ट्रातील समस्या सोडवण्यासाठी आज संघटना व कायदे आहेत. त्याचे पालन केले जाते. पहिल्या महायुद्धापूर्वी जगात तशी व्यवस्था नव्हती. आंतरराष्ट्रीय करार मोडल्यास किंवा बलिष्ठाने दुबळ्या देशावर अन्याय, आक्रमण केल्यास दाद मागण्याची व्यवस्था नव्हती. प्रत्येक राष्ट्र स्वतःच्या इच्छेप्रमाणे वागत असे. 1899 व 1907 साली दोन शांतता परिषदा झाल्या. त्यामध्ये आंतरराष्ट्रीय कायदेसंहिता यशस्वी ठरली असती. पण तसे न होता 'बळी तो कान पिळी' या न्यायाने देश वागले.

९) बाल्कन प्रश्न :-

बाल्कन प्रश्नावरून ऑस्ट्रिया-सर्बिया यांच्यातील शत्रुत्व वाढत गेले. ऑस्ट्रियाचा राजपुत्र आर्च ड्युक फर्डिनांड आपल्या पत्नीसह बोस्नियाची राजधानी सेरोजेव येथे गेला होता. तेथे एका दहशतवादी संघटनेने त्याचा खून केला. सर्बियाने त्यासाठी शस्त्रास्त्रे पुरवली. चिथावणी दिली असा ऑस्ट्रीयाने आरोप केला. आणि 48 तासांची मुदत सर्बियाला दिली. जर्मनीने ऑस्ट्रियाला तर रशियाने सर्बियाला पाठिंबा दिला. दरम्यान युद्ध टाळण्याचे काही प्रयत्न झाले. पण ऑस्ट्रियाने ताठर भुमिका घेतली. आणि सर्बियाविरुद्ध युद्ध पुकारले. यातून पहिले महायुद्ध सुरू झाले.

115

10

" ज्ञान, विज्ञान आणि सुसंस्कार यांसाठी शिक्षण प्रसार "
- शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे

Signature of Supervisor

Shri Swami Vivekanand Shikshan Sanstha's
VIVEKANAND COLLEGE (Autonomous), KOLHAPUR

20/9/2020

Class B.A - II Div — Roll No. 5074

Suppliment No. Home Assignment Subject History

Test / Tutorial No. Devesh Dashrath Ingwale

प्र.1) पहिल्या महायुद्धाच्या कारणांची चिकित्सक परिक्षण करा.

बिस्मार्कच्या प्रयाणानंतर युरोपमध्ये परस्पर अविश्वासाचे व स्पर्धेचे वातावरण निर्माण झाले. व परिणामी त्यातुनच प्रत्येक राज्यात शस्त्र स्पर्धा निर्माण झाली. या शस्त्रस्पर्धेचा परिणाम महायुद्धात घडुन आला. अशा रितीने जर्मनी व इटली ह्या राष्ट्रांचा उदय झाल्यानंतर युरोपच्या राजकारणात जे स्पर्धेचे वातावरण निर्माण झाले त्यातुनच हे महायुद्ध घडुन आले.

पहिले महायुद्ध अतिशय विनाशकारी ठरले. ते जवळ-जवळ 1535 दिवस म्हणजे 4 वर्षे लढले गेले. त्यात जवळजवळ 65 कोटी लोकांनी भाग घेतला व 13 कोटी लोक त्यात ठार झाले. 22 कोटी लोक जखमी झाले व 7 कोटी लोक कायमचे पंगु झाले. पहिले महायुद्ध इतक्या विशाल प्रमाणावर झाल्याने ते कोणत्या परिस्थितित निर्माण झाले किंवा ते होण्यास कोणती कारणे घडुन आलीत ती कारणे पाहणे आवश्यक ठरते.

* पहिल्या महायुद्धाची कारणे =

1) दोन परस्पर विरोधी गट -

युरोपात गटबाजीचे राजकारण बिस्मार्कच्या काळा-पासुन म्हणजे इ.स 1870 पासुन उदयाला आलेले आप-ल्याला दिसुन. जर्मनिचे एकीकरण टिकवुन धरण्याकरिता बिस्मार्क कोणतेही नैतिक संकेत न मानता युरोपातील कोणत्याही राष्ट्राशी मैत्री करायला तयार होता. बिस्मार्कच्या 'फोडा आणि जोडा' ह्या धोरणामुळे युरोपातील देश दोन गटात विभागले जाऊन

(116)

हे दोन्ही गट एकमेकांशी संघर्ष करण्यास उत्सुक बनले. बिस्मार्क-च्या आपल्या कारकिर्दीत रशिया आणि फ्रान्स यांना एकमेकांत मैत्री करण्यापासुन परावृत्त केले होते. परंतु बिस्मार्कच्या मृत्युनंतर राजकीय वातावरणात आमुलाग्र बदल घडुन आले. युरोप दोन सशस्त्र गटात विभागला गेला व या दोहोत परस्पर द्वेष, असुया, स्पर्धा आणि प्रखर हेवेदावे असल्याने त्याची परिणती पहिल्या महायुध्दात घडुन आली.

2) असुरक्षिततेच्या भावनेतुन निर्माण झालेली लष्करी स्पर्धा

दोन परस्परविरोधी गट युरोपात अस्तित्वात असताना त्यांना एकमेकांची भिती वाटणे साहजिकच होते. युध्दाचा उद्भव केव्हाही होणे शक्य असल्याने प्रत्येक राष्ट्राने शस्त्रसज्ज होण्याची स्पर्धा सुरु केली. त्यामुळे प्रत्येक राष्ट्रांचा लष्करावरचा खर्च मोठ्या प्रमाणात वाढला. त्यामुळे युरोपात अनिर्बंध लष्करीकरणाची लाट निर्माण झाली. होउन त्याची परिणती महायुध्दात घडुन आली.

3) राष्ट्रवादाची प्रखर भावना व त्यातुन निर्माण झालेल्या विकृती =

अमेरिकन स्वातंत्र्य, युध्द, फ्रेंच राज्यक्रांती इ. विविध घटनांनी राष्ट्रवादाला जन्म दिला होता. एक भाषा, एक संस्कृती असणाऱ्या लोकांचे एक राष्ट्र असले पाहिजे ही भावना नैसर्गिक होती व म्हणुनच त्यातुनच जर्मनी, इटली-सारख्या राष्ट्र राज्याचा उदय झाला. परंतु पलीकडे राष्ट्र-निष्ठा, राष्ट्रप्रेम यांचा मोठा विकृत अर्थ प्राप्त झाला. राजकारणी नेत्यांनी राष्ट्रभावनेचा पुरेपुर उपयोग करुन घेऊन परस्परांच्या द्वेष भावनेला मोठे खतपाणी घातले. शासकांनी अतिरेकी राष्ट्रभावनेला आवर न घातल्याने त्यातुन महायुध्द उद्भवले.



ESTD JUNE 1964 (Autonomous)

4) आर्थिक वर्चस्वाची अभिलाषा-

१७ व्या शतकाला जुना वसाहतवाद लयाला जावुन त्याची जागा आता नवीन साम्राज्यवादाने घेतली. औद्योगिक क्रांतीनंतर उत्पादनाच्या तंत्रात अमुलाग्र क्रांती घडुन येताच यंत्राच्या सहाय्याने मोठ्या प्रमाणात उत्पादन होवु लागले. त्यामुळे युरोपातल्या प्रत्येक राष्ट्राला आपल्या देशात निर्माण झालेल्या जास्तीच्या मालाकरिता नवीन बाजारपेठांची आवश्यकता वाटु लागली. अशा रितीने मोठाच आर्थिक साम्राज्यवाद निर्माण होऊन त्याचे रूपांतर एकमेकांच्या द्वेषभावनेत झाले. आर्थिक वर्चस्व निर्माण करण्याच्या प्रयत्नातुन महायुध्द निर्माण झाले.

5) वृत्तपत्रीय एकांगी विषारी प्रचार =

ह्या काळात एकमेकांविषयीची मने अगोदरच झालेली होती. त्यात वैरभावना पेरविण्याचे कार्य दुर्दैवाने वृत्तपत्रातील एकांगी प्रचाराने केले. प्रत्येक राष्ट्रातील वृत्त-पत्रांनी राष्ट्रभावनेवर जोर देऊन राष्ट्रीय भावना चेतविण्याचा सतत प्रयत्न केला.

6) युरोपीय पुर्वग्रह दुषित मन =

वृत्तपत्रांनी सतत केलेल्या भडक प्रचारामुळे राजकारणी लोकांनी केलेल्या विकृत प्रचारामुळे युरोपीय जनमत प्रक्षुब्ध बनले. व त्यांचे संतुलन बिघडले. त्यातच राजकारणात प्रामाणिकपणा व सचोटी यांना अर्थ न उरल्याने युरोपीय मन प्रत्येक प्रश्नाकडे पुर्वग्रहदुषित दृष्टीनेच पाहु लागले. एका दृष्टीने युरोपीय मनात विकृती निर्माण झाली व त्याचेच पर्यावसन महायुध्दात घडुन आले.

COLLEGE KOLHAPUR ESTD JUNE 1964

7) राजकारणी गुप्ततेची वाटचाल =

ह्या कालखंडातील आंतरराष्ट्रिय राजकारणाचे आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे त्यातील कमालीची गुप्तता. पुष्कळवेळा राजप्रमुख स्वतःच्या मंत्रिमंडळाला अंधारात ठेवुन इतर देशांशी गुप्त करार करीत असे. ह्या राजकारणातील गुप्ततेमुळे व परस्पर व अविश्वास आणि संशय निर्माण झाला. त्यामुळे अस्थिरता निर्माण होऊन महायुध्दाला उद्भव झाला.

8) तत्वज्ञानांची शिकवण =

ह्या काळात हेगेल आदी जे तत्वज्ञ होऊन गेलेत त्यांच्याटी तत्वज्ञानाचा मोठा सखोल परिणाम जर्मन तरुणांवर घडुन आला. हेगेलने राष्ट्र म्हणजे परमेश्वर अशी शिकवण देऊन राष्ट्राकरिता व्यक्तीने आत्मसमर्पण करण्याकरिता सतत तयार असावे असा पुरस्कार केला. ह्या सर्व व तत्वज्ञानाच्या परिपाक म्हणजे जर्मन तरुण युध्दावर मनापासुन श्रध्दा ठेवु लागला व त्यातुनच पहिले महायुध्द उद्भवले.

9) तत्कालिन कारण = आर्च ड्युक फर्डिनंडचा खुन =

अशा रितीने उभय पक्षात वैराग्नी पेटला असताना आणि संपुर्ण युरोपात विलक्षण तणावाचे व प्रक्षोभाचे वातावरण निर्माण झाले असताना ह्या वातावरणात एक भयंकर घटनेची ठिणगी पडली ती ही भयंकर घटना म्हणजे ऑस्ट्रीयाच्या राजपुत्र आर्च ड्युक फ्रान्सिस फर्डिनंड व त्याची पत्नी यांचा खुन हे दोघेही बोस्निया प्रांताची राजधानी सराजेवो ह्या ठिकाणी गेले असताना त्यांच्या भररस्त्यात खुन करण्यात आला. (29 जुन 1914) ह्या खुनामुळे संपुर्ण युरोपात एकच निषेधाची व प्रक्षोभाची लाट निर्माण झाली. ऑस्ट्रियन सरकारने या खुनाला सर्बियाला जबाबदार धरले. सर्बियाने खुनाची जबाबदारी नाकारली. त्यामुळे ऑस्ट्रियाने 25 जुलै 1914 रोजी सर्बियाविरुध्द युध्द पुकारले व अशारितीने पहिल्या महायुध्दास तोंड लागले.

119

JUNE 1994

10/10 [illegible]

Page No.
Date

Rutuja Sunil Kamble
B.A. II
History
20/9/2020 5107

प्र 1. पहिल्या महायुद्धाच्या कारणांचे चिकित्सक परिक्षण करा.

→ इतिहासातील सर्वात मोठ्या युद्धांपैकी एक असे हे पहिले महायुद्ध 28 जुलै 1914 पासून ११ नोव्हेंबर पासून 11 नोव्हेंबर 1918 पर्यंत चालले. बिस्मार्कच्या पदत्यागानंतर युरोपमध्ये परस्पर स्पर्धेचे व अविश्वासाचे वातावरण निर्माण झाले व परिणामी यातून प्रत्येक राज्यात शस्त्रस्पर्धा निर्माण झाली. यासर या शस्त्रस्पर्धेचा परिणाम महायुद्ध घडून आले. अशाप्रकारे जर्मन व इटली या राष्ट्रांचा उदय झाल्यानंतर युरोपच्या राजकारणात जे स्पर्धेचे वातावरण निर्माण झाले त्यातूनच महायुद्ध घडून आले.

पहिल्या महायुद्धाचे परिणाम अतिशय विनाशकारी होते. ४ वर्षांच्या कालावधीत हे लढले गेले. त्यात जवळपास 65 कोटी भाग घेतला, व 13 कोटी लोक ठार झाले. 22 कोटी लोक जखमी झाले व 17 कोटी लोक कायमचे पंगू झाले.

पहिले महायुद्ध घडून येण्याची कारणे पुढीलप्रमाणे ः

1) दोन परस्पर विरोधी गट ः —

युरोपात गटबाजीचे राजकारण इ.स. 1870 पासून उदयाला आलेले आपल्याला दिसून येते. जर्मनीचे एकीकरण टिकवून ठेवण्याकरिता बिस्मार्क कोणतेही नैतिक संकोच न मानता युरोपातील कोणत्याही राष्ट्राशी मैत्री करायला तयार होता. बिस्मार्कच्या फोडा आणि जोडा या धोरणामुळे युरोपातील देश दोन गटात विभागले. जेकन हे दोन्ही गट

(120)

एकमेकांशी संघर्ष करण्यास उत्सुक बनले. बिस्मार्कने त्याच्या कारकीर्दीत रशिया आणि फ्रान्स यांना एकमेकांत मैत्री करण्यापासून परावृत्त केले होते परंतु बिस्मार्कच्या मृत्युनंतर राजकीय वातावरण आमुलाग्र बदल घडून आले. युरोप दोन शस्त्रसज्ज सशस्त्र शस्त्र विभागात गेला. त्या देशात परस्पर द्वेष अशा स्पर्धा आणि प्रखर हेवे दावे असल त्याची परिणिती पहिल्या महायुद्धात घडून आली

2) असुरक्षिततेच्या भावनेतून निर्माण झालेली लष्करी स्पर्धा :-

दोन परस्पर विरोधी गट युरोपात अस्तित्वात असताना त्यांना एकमेकांची भिती वाटणे स्वाभाविकच होते. युद्धाच्या उद्भव केव्हाही होणे शक्य असल्याने प्रत्येक राष्ट्राने शस्त्रसज्ज होण्याची स्पर्धा चालवली. त्यामुळे प्रत्येक राष्ट्राचा लष्करावरचा खर्च मोठ्या प्रमाणात वाढला. त्यातु युरोपात अनिर्बंध लष्करी सामग्रीची लाट निर्माण होऊन त्यांची परिणिती शेवटी महायुद्धा घडून आली.

3) राष्ट्रवादाची प्रखर भावना व त्यातून निर्माण झालेल्या विकृती :-

→ अमेरिकन स्वातंत्र्य युद्ध फ्रेंच राज्यक्रांती व विविध घटनांनी राष्ट्रवादाला जन्म दिलेला होता. एक एक भाषा, एक संस्कृती असणाऱ्या लोकांचे एक राष्ट्र असले पाहिजे ही भावना नैसर्गिक होती व म्हणूनच त्यातूनच जर्मनी इटलीसारख्या राष्ट्र राज्याचा उदय झाला. परंतु पालकडे राष्ट्रनिष्ठा व प्रेम यांना मोठा विकृत अर्थ प्राप्त झाला. राजकारणी नेत्यांनी राष्ट्रभावनेचा पुरेपूर उपयोग करून घेऊन परस्परांच्या द्वेष

भावनेला मोठे खतपाणी घातले. शासकीय अतिरेकी राष्ट्रभावनेला आवर न घातल्याने त्यातून महायुद्ध उद्भवले.

4) आर्थिक वर्चस्वाची अभिलाषा :-

19 व्या शतकाचा जुना वसाहतवाद जाऊन त्याची जागा आता नविन साम्राज्यवादाने घेतली. औद्योगिक क्रांतीनंतर उत्पादनाच्या तंत्रात आमूलाग्र बदल घडून येऊन यंत्राच्या साहाय्याने मोठ्या प्रमाणात उत्पादन होऊ लागले. त्यामुळे युरोपातल्या प्रत्येक राष्ट्राला आपल्या देशात निर्माण झालेल्या जास्तीच्या मालाकरिता नवीन बाजारपेठांची आवश्यकता वाटू लागली. अशा रितीने मोठ्या आर्थिक साम्राज्यवाद निर्माण होऊन त्याचे रुपांतर एकमेकांच्या द्वेषभावनेत झाले.

5) वृत्तपत्रिय एकांगी विचार :-

या काळामध्ये एकमेकांविषयीची मते अगोदरच द्वेषाची झाली होती. त्यात वैरभावना पेटविण्याचे कार्य दुर्दैवाने वृत्तपत्रातील एकांगी प्रचाराने केले. प्रत्येक राष्ट्रातील वृत्तपत्रांनी राष्ट्र भावनेवर जोर देऊन राष्ट्रीय भावना पेटविण्याचा सतत प्रयत्न केला. त्यामुळे हे महायुद्ध घडून आले.

6) राजकारणातील गुप्ततेचा वाचाळ :-

या कालखंडातील आंतर राष्ट्रीय राजकारणाचे आणखी एक वैशिष्ट्ये म्हणजे त्यातील कमालीची गुप्तता. पुष्कळ वेळा राज्यप्रमुख स्वतःच्या मंत्रीमंडळाला अंधारात ठेऊन इतर देशाशी गुप्त करार करीत असे. ह्या राजकारणातील गुप्ततेमुळे परस्पर अविश्वास झाले. आणि संशय निर्माण झाला.

7) तत्वज्ञानाची शिकवण :-

COLLEGE ESTD JUNE 1964 (Autonomous)

122

या काळात हेगेल आदि जे तत्वज्ञ होऊन गेले त्यांच्याही तत्वज्ञानाचा मोठा सखोल परिणाम जर्मन तरुणांवर होऊ लागला. हेगेलने राष्ट्र म्हणजे परमेश्वर अशी शिकवण देऊन राष्ट्राकरिता व्यक्तीने आत्मसमर्पण करण्याकरिता सतत तयार असावे असा पुरस्कार केला. या सर्व तत्वज्ञानाचा परिणाम म्हणजे जर्मन तरुण युद्धावर मनापासून श्रद्धा ठेऊ लागला. व त्यातूनच पहिले महायुद्ध उद्भवले.

७) <u>तत्कालीन कारण</u> - <u>आर्च ड्यूक फर्डिनंडचा खून</u> :-

राष्ट्रांमध्ये अभूतपूर्व वैराची पेरणी असताना आणि संपूर्ण युरोपात विलक्षण व प्रक्षोभक वातावरण निर्माण झाले असताना या वातावरणात भयंकर घटनेची ठिणगी पडली ती भयंकर घटना म्हणजे ऑस्ट्रियाचा राजपुत्र आर्च ड्यूक फ्रान्सिस फर्डिनांड व त्याची पत्नी यांचा खून हे होय. बोस्नियाच्या प्रांताची राजधानी सेराजेवो या ठिकाणी गेले असताना त्यांचा भर रस्त्यात खून करण्यात आला. (२८ जून ९१४) या खुनामुळे संपूर्ण युरोपात एकच विरोधाची व प्रक्षोभाची लाट निर्माण झाली.

ऑस्ट्रियन सरकारने या खुनाला सर्बियाला जबाबदार धरले. सर्बियाने खुनाची जबाबदारी नाकारली. त्यामुळे ऑस्ट्रियाने २८ जुलै १९१४ रोजी सर्बियाविरुद्ध युद्ध पुकारले.

या वरील कारणांमुळे फक्त ऑस्ट्रिया-हंगेरी आणि सर्बिया यांच्यामध्येच युद्ध न भडकता ते सर्व राष्ट्रांमध्ये पेटले ते आपल्याला
(123) वरील कारणांवरून दिसते. या महायुद्धाचे परिणाम पुढे प्रचंड भयानक स्वरूपाचे होते अशा प्रकारे आपल्या पहिल्या महायुद्धाचे कारण स्पष्ट होते.